अहवाल क्रमांक : १४३

# पंचायती राज समिती

## २०१५-२०१६

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ व २००९-२०१० च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत**

# पहिला अहवाल

(सदर अहवाल दिनांक  जुलै २०१५ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई
२०१५

# पंचायती राज समिती

## २०१५-२०१६

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ व २००९-२०१० च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत**

# पहिला अहवाल

एचबी ११७५—१

## पंचायती राज समिति

(सन २०१५-२०१६)

**समिति प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.

४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

९. श्री. राजेंद्र नजरधाने, वि.स.स.

१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

१४. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

१५. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.

१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

१७. श्री. अमित झनक, वि.स.स.

१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.





२१. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.

२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव,

(३) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव,

(४) श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती),

(५) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी.

## पंचायती राज समिती

(सन २०१३-२०१४)

**समिती प्रमुख**

१. श्री. जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. काशिराम पावरा, वि.स.स.

३. श्री. वैजनाथ शिंदे, वि.स.स.

४. श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

५. श्री. विजयराव खडसे, वि.स.स.

६. श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

७. श्री. दिलीप माने, वि.स.स.

८. श्री. भारत भालके, वि.स.स.

९. श्री. बाबासाहेब पाटील, वि.स.स.

१०. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

११. डॉ. राजेंद्र शिंगणे, वि.स.स.

१२. श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.

१३. श्री. संजय भेगडे, वि.स.स.

१४. श्री. भिमराव तापकीर वि.स.स.

१५. श्री. राजकुमार बडोले वि.स.स.

१६. श्री. संजय राठोड, वि.स.स.

१७. श्री. सुर्यकांत दळवी, वि.स.स.

१८. ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स.

१९. श्री. प्रकाश भोईर, वि.स.स.

२०. श्री. राजाराम ओझरे, वि.स.स



२१. श्री. एम. एम. शेख, वि.प.स.

२२. डॉ. सुधीर तांबे, वि.प.स.

२३. श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

२४. श्री. विक्रम काळे, वि.प.स.

२५. श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

**निमंत्रित**

२६. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

२७. श्री. सुरेश हळवणकर, वि.स.स.

२८. श्री. दादाराव केचे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव,

(३) श्री. गंगाधर कोहळे, उप सचिव,

(४) श्री. ना. रा. थिटे, अवर सचिव.

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरून पंचायती राज समितीचा पहिला अहवाल सादर करीत आहे.

सन २०१५-२०१६ करीता समिती दिनांक २५ मे २०१५ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

सन २००८-२००९ व २००९-२०१० या वर्षाच्या लेखा परिक्षा पुर्नविलोकन अहवालाच्या संदर्भात सन २०१३-२०१४ साठी गठीत झालेल्या समितीने गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली.

समितीने गोंदिया जिल्हा परिषदेस दिनांक ७, ८ व ९ जानेवारी २०१४ रोजी भेट देऊन श्री. ज्ञा. द. शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली.

समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेस दिनांक १७, १८ व १९ जुलै २०१४ रोजी भेट देऊन श्री. दिलीप पांढरपट्टे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१३-२०१४ करीता गठीत झालेल्या समितीने गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २५ व २६ जून २०१४ रोजी आणि दिनांक २ जुलै २०१४ रोजी जिल्हा परिषद, गोंदिया तसेच दिनांक १६ जून २०१५ रोजी आणि दिनांक १ जुलै २०१५ रोजी जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/ प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी डॉ. एस. के. गोयल, अपर मुख्य सचिव, कृषी व पणन विभाग, श्री. एस. एस. संधू, प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, जलसंधारण विभाग, श्री. उज्वल उके, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, श्री. संजय कुमार, प्रधान सचिव, महिला व बालकल्याण विभाग, श्री. विजय कुमार, प्रधान सचिव, 



वित्त (सुधारणा) विभाग, श्री. प्रभाकर देशमुख, सचिव, रोजगार हमी योजना विभाग, श्री. राजगोपाल देवरा, सचिव, आदिवासी विकास विभाग, श्री. शरद सबनीस, सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री. विवेक नाईक, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री. आर. डी. शिंदे, सचिव, सामाजिक न्याय विभाग, श्री. दि. ग. मोरे, सहसचिव, ग्रामविकास विभाग, श्री. प्रकाश ठुबे, सहसचिव, शालेय शिक्षण विभाग, डॉ.नरेश गिते, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. राजेंद्र पवार, उप सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. गोपीनाथ आल्हाट, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग, डॉ. सतीश पवार, संचालक, आरोग्य सेवा, मुंबई, डॉ. (श्रीमती) अर्चना पाटील, अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, मुंबई, श्री. सु. सं. धांडे, मुख्य अभियंता, महावितरण कंपनी, मुख्य कार्यालय, मुंबई, श्री. वि. ज. सुरळकर, संचालक, विमा संचालनालय, मुंबई, श्री. अरविंदकुमार झा, प्रधान मुख्य संरक्षक, वन विभाग, श्री. भगवान, अपर प्रधान मुख्य संरक्षक, वन विभाग, तसेच श्री. का. मा. विधाते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेखा परीक्षा पुर्नविलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१५-२०१६ साठी नव्याने गठित झालेल्या समितीने दिनांक २४ जुलै २०१५ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २४ जुलै २०१५.

**संभाजी निलंगेकर-पाटील,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ. क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| | | **प्रकरण एक**<br>**जिल्हा परिषद, गोंदिया**<br>**(सन २००८-२००९)** | | |
| १ | १.१ | खोटी रजा प्रवास सवलत देयके सादर करून शासनाचे नुकसान केल्याबाबत. | ३.११२ | १ |
| | १.२ | अनुसूचित जाती/नवबौद्ध लाभार्थ्यांना ५० टक्के अनुदानावर शेळ्यांचे गट वाटपाबाबत. | ३.७५८ | ६ |
| | १.३ | ६ महिने ते १ वर्ष तसेच ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील कुपोषित मुलांना पौष्टिक आहार म्हणून नाचणी, खीर पुरविण्याबाबत. | ३.९८६ | १३ |
| | १.४ | पुरक पोषण आहार पुरवठ्याबाबत | ३.९८७ | १५ |
| | | **(सन २००९-२०१०)** | | |
| | १.५ | सन २००९-१० या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी. | ३.१०३६ | २० |
| | | **प्रकरण दोन**<br>**जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग**<br>**(सन २००८-२००९)** | | |
| २ | २.१ | मागासवर्गीय महिलांना शिलाई मशिन पुरविण्यासाठी अर्थसहाय्य | ३.७८(६) | २३ |
| | | **(सन २००९-२०१०)** | | |
| | २.२ | विमा व रॉयल्टीची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल न केल्याबाबत व बांधकामाच्या इतर अनियमिततेबाबत. | ३.१४(७) | ३० |
| | २.३ | नेरुर कार्यात नारुर रस्ता डांबरीकरण तथा नूतनीकरण | ३.१४(८) | ४२ |
| | | **परिशिष्ट " अ "**<br>शासनाचे आदेश व परिपत्रक | | |
| | | **परिशिष्ट " ब "**<br>समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | | |


## प्रकरण एक
## जिल्हा परिषद, गोंदिया

### १.१ खोटी रजा प्रवास सवलत देयके सादर करून शासनाचे नुकसान केल्याबाबत (परिच्छेद क्रमांक ३.११२) :-

पंचायत समिती, गोरेगाव अंतर्गत एकूण १९२ शिक्षक व परिचरांनी रजा प्रवास सवलत उपभोगल्याने त्यांना रुपये ९८८२४२ चे प्रदान केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) गोंदिया ते कोल्हापूर रेल्वे प्रवास द्वितीय श्रेणी आरक्षित तिकिटाचे दर रु. ३९० असतांना रु. ४७० नमूद केलेले आहेत. तसेच कोल्हापूर ते वेंगुर्ला अंतर १५० किलोमीटर असताना ३४० किलोमीटर दर्शवून व बसभाडे प्रत्यक्षात रु. ९५ असताना रु. २३० दर्शविल्याने संबंधितांनी प्रत्यक्ष प्रवास न करता खोटी देयके सादर करून शासनाचे रु. ९,८८,२४२ नुकसान केलेले आहे.

(२) प्रत्यक्षात प्रवास केलेल्या कर्मचाऱ्यांनी आपली प्रवास देयके स्वतः सादर करणे अभिप्रेत असताना रजा प्रवास देयके जवळपास एकाच हस्ताक्षरात तयार केल्याचे आढळून येते.

(३) उपरोक्त बाबीवरून आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी देयके तपासल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे शासन नुकसानीची रक्कम रु. ९,८८,२४२ वसूल होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपांसंदर्भात जिल्हा परिषद, गोंदिया यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा प्राप्त झाला आहे.**

सन २००८-०९ पंचायत समिती गोरेगांव अंतर्गत एकूण १९२ शिक्षक व परिचरांनी रजा सवलत उपभोगले असता,

(१) लेखा परिक्षणात नमूद केलेली अतिप्रदानाची रक्कम वसूल करून शासन खाती जमा केलेली आहे.

(२) देयक संबंधित कर्मचाऱ्याच्या स्वाक्षरीचे आहे.

(३) उपरोक्त बाबी लेखा परिक्षण करताना निदर्शनास आल्यावर आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी संबंधित शिक्षक व परिचर यांचेकडून अतिप्रदान झालेले रु.१,३६,०९५ रेल्वे तिकिट दर व बसभाडे वसूल केले आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

गोंदिया जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ७ जानेवारी २०१४ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने, चुकीची/

खोटी रजा प्रवास सवलत देयके सादर केल्यानंतर त्याची तपासणी का करण्यात आली नाही, सर्व प्रवास देयके एकाच हस्ताक्षरात आहेत काय, सदरहू देयके शिक्षणाधिकारी, गट विकास अधिकारी यांच्या स्तरावर मंजूर झाली काय, संगनमत करून चुकीची प्रवास देयके सादर केली आणि ही बाब निदर्शनास आल्यानंतर फरकाची रक्कम भरण्यात आली काय, या प्रकरणी शिक्षणाधिकारी, गट विकास अधिकाऱ्यांवर तसेच चुकीची देयके सादर करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली काय, अशी पृच्छा केली असता, या प्रकरणी शासनाची झालेली फसवणूक मान्य करून शिक्षणाधिकारी यांनी या प्रकरणामध्ये १६९ शिक्षक, १० मुख्याध्यापक, २ विस्तार अधिकारी, २ केंद्र प्रमुख, ८ परिचर, १ लिपिक अशा एकूण १९२ जणांनी प्रवास सवलतीचा लाभ घेतलेला आहे. तथापि, सर्व खर्च बनावट असल्याने संबंधितांकडून पूर्ण रकमेची वसूली केली आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले. तसेच प्रवासभाडे जवळच्या अंतराचे द्यावे असा शासनाचा नियम आहे. तथापि, शिक्षकांनी प्रवासच केलेला नाही ही बाब संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी स्पष्ट केली. शिक्षणाधिकारी आणि गट विकास अधिकारी यांनी सदर देयके मंजूर केलेली असल्यामुळे या प्रकरणात ते सुद्धा तेवढेच जबाबदार आहेत. या प्रकरणात १९२ जण गुंतलेले आहेत. हे प्रकरण गंभीर असले तरी इतक्या जणांवर गुन्हा दाखल करावा असे वाटत नाही. परंतु संबंधितांची एक वेतनवाढ रोखावी व त्यांच्याकडून रक्कम वसूल करावी आणि शिक्षकांकडून अशी चूक पुन्हा होता कामा नये अशी त्यांना समज देण्यात यावी असे समितीने निदेश दिले. त्यावर शिक्षकांच्या प्रवास सवलतीची देयके कोणी मंजूर केली त्याची तपासणी करून यामध्ये कोणकोण जबाबदार आहेत याची माहिती घेण्यात येईल असे समितीस सांगण्यात आले. शिक्षकांनी पैसे भरलेले आहेत आणि रक्कम बँकेच्या खात्यावर जमा झालेली आहे. त्यामुळे या प्रकरणामध्ये प्रवास सवलत देयकावर ज्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत ते सर्वजणच दोषी आहेत. या समितीच्या आक्षेपावर या प्रकरणाची चौकशी करून जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

त्याबाबत समितीसमोर खुलासा करताना यातील दोषी १९२ जणांची वेतनवाढ थांबविण्याचे, शिक्षक प्रवास सवलतीची देयके कोणी मंजूर केली त्यांची चौकशी करून दोषींवर जबाबदारी निश्चित करण्याचे व दोषी शिक्षकांची १ वेतनवाढ व शिक्षणाधिकारी व अन्य संबंधितांची कायमस्वरूपी वेतनवाढ रोखण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्य केले.

**समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहिती संदर्भात साक्षीच्या अनुषंगाने खालील मुद्यांबाबत समितीने माहिती मागविली.**



खोटी रजा प्रवास सवलत देयके सादर करून शासनाचे नुकसान केल्याप्रकरणी १९२ शिक्षक व परिचारकांविरूद्ध सदरची देयके पारित करणाऱ्यांविरूद्ध कोणती कार्यवाही करण्यात आली, संबंधित सर्व शिक्षक, गटविकास अधिकारी, सहायक लेखा अधिकारी व इतर यांची एक वेतनवाढ रोखणे व त्यांच्याकडून देयकाची रक्कम वसूल करण्याबाबत काय कारवाई करण्यात आली आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

खोटी रजा प्रवास देयके सादर करून शासनाचे नुकसान केल्याप्रकरणी १९२ शिक्षण व शिक्षकेत्तर कर्मचारी असून त्यापैकी एका शिक्षकाचे नाव दोन वेळा आल्यामुळे १९१ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी असून त्यांची एक वेतनवाढ तात्पुरती स्वरूपाची बंद करण्यात आलेली आहे. तसेच ज्यांनी ही देयके पारित केलेली आहेत.—(१) श्री. पी.जी.इळपाते, कनिष्ठ सहायक, (२) श्री. पी.जी.फुलझेले, कनिष्ठ सहायक, (३) श्री. जी.सी.बीरनवार, कनिष्ठ सहायक यांची एक वेतनवाढ कायमस्वरूपी थांबविण्यात आली आहे. तसेच तत्कालीन खंड विकास अधिकारी तथा प्रभारी गटशिक्षणाधिकारी श्री. बी.एन.मडावी यांच्यावर कार्यवाही करण्यासाठी शासनास पत्र दिलेले आहे. संपूर्ण रक्कम वसूल करण्याबाबत गट विकास अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

**या संदर्भात शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून त्यांच्या क्रमांक पंरास-३९१४/(६३/१४)/समन्वय, दिनांक २३ जून २०१४ रोजीच्या पत्रान्वये खालील माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समितीस्तरावरून मंजूर करण्यात आलेल्या रजा प्रवास सवलत आणि प्रवास देयके यांच्या अति प्रदानासंदर्भातील आहे. तथापि, रजा प्रवास सवलत देयके आणि प्रवास देयके मंजूर करताना अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यावर अतिप्रदान झालेली रक्कम वसूल करण्यात आल्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, गोंदिया यांनी नमूद केले आहे. पंचायत समितीस्तरावरील देयके मंजूर करण्याचे अधिकार आहरण व संवितरण अधिकारी म्हणून गटविकास अधिकारी यांना आहेत. गटविकास अधिकारी हा संवर्ग मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे नियंत्रणाखाली असून जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी नियुक्ती प्राधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अधीनस्त आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या संबंधित कर्मचारी यावर अतिप्रदानाबाबत कारवाई मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि संबंधित प्रशासकीय विभाग, ग्रामविकास विभाग यांचे स्तरावरूनन होणे अपेक्षित आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २५ जून २०१४ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने खोटी रजा प्रवास सवलत देयके सादर करून शासनाचे नुकसान केल्या प्रकरणी १९२ शिक्षक, परिचारक आणि सदरची देयके पारित करणाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली, संबंधित सर्व शिक्षक, गटविकास अधिकारी, सहायक लेखा अधिकारी व इतर यांची एक वेतनवाढ रोखणे व त्यांच्याकडून देयकाची रक्कम वसूल करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे अशी विचारणा केली.

याबाबत या कर्मचाऱ्यांनी एकाच अंतराचे वेगवेगळ्या स्तरावरून वेगवेगळ्या प्रकारच्या रकमांची बिले दिली. त्यावरून त्यांनी प्रवासच केला नसल्याचे स्पष्ट होत आहे. सर्व प्रकरणांमध्ये अपहार झालेली एकूण रक्कम ९ लाख ८८ हजार होती. त्यापैकी १ लाख ३६ हजार इतकी रक्कम वसूल झाली आहे. तथापि, शंभर टक्के वसुली करावयाची आहे, त्यामुळे शासनास फक्त वसूलीच करून थांबता येणार नाही. त्याचबरोबर त्यांच्यावर खोटारडेपणासाठीही कारवाई झाली पाहिजे. त्यासाठी तशी बिले सादर करणाऱ्या संबंधितांची बैठक घेण्यात यावी असे त्यांनी जिल्हा परिषदेस निदेश दिल्याची माहिती विभागीय सचिवांकडून समितीस प्राप्त झाली.

गोंदिया ते कोल्हापूर रेल्वे प्रवास द्वितीय श्रेणी तिकिटाचा दर ३९० रुपये असताना तो वाढीव ४७० रुपये दाखविण्यात आला आहे. तसेच, कोल्हापूर ते वेंगुर्ला अंतर १५० कि.मी. असताना वाढवून ते ३४० कि.मी. दाखविण्यात आले आहे. बसभाडे ९५ रुपये असताना वाढवून ते २३० रुपये दाखविले आणि संबंधितांनी बिले मंजूर केली. या समितीच्या आक्षेपावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांची एक वेतनवाढ थांबविलेली आहे. तसेच या संदर्भात चौकशी करून शहानिशा केल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी बैठकीच्या शेवटी समितीसमोर स्पष्ट केले.

**अभिप्राय व शिफारस :**

पंचायत समिती, गोरेगांव अंतर्गत एकूण १९२ शिक्षक व परिचरांनी रजा प्रवास सवलत योजनेंतर्गत गोंदिया ते कोल्हापूर असा द्वितीय श्रेणीचा प्रवास करताना गोंदिया ते कोल्हापूर द्वितीय श्रेणीचे भाडे प्रत्यक्षात रुपये ३९० असताना रुपये ४७० दर्शविले, बस भाडे प्रत्यक्षात रुपये ९५ असताना रुपये २३० दर्शविले. तसेच कोल्हापूर ते वेंगुर्ले हे अंतर प्रत्यक्षात १५० कि.मी. असताना ते ३४० कि.मी. दर्शवून तसेच प्रत्यक्ष प्रवास न करता खोटी देयके सादर करून जिल्हा परिषदेकडून रुपये ९,८८,२४२ एवढ्या प्रवास न केलेल्या रकमेची देयके सादर करून शासकीय रकमेचा अपहार केला होता.



सदर बाब लेखा परीक्षणाच्या वेळी निदर्शनास आल्यानंतर झालेल्या अतिप्रदानापैकी फक्त रु.१,३६,०९५/- एवढ्या रकमेची वसुली करण्यात आली होती. जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या बेकायदेशीर कृत्यास जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही शहानिशा न करता मंजुरी दिल्याचे स्पष्ट होत होते.

सदर बाब सन २००८-०९ मध्ये उघडकीस येऊन देखील सन २०१४ म्हणजे या विषयी समितीपुढे सचिवांची साक्ष होईपर्यंत ५ वर्षांत या प्रकरणी संबंधितांविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून समिती याबाबत खेद व्यक्त करते. **सदर प्रकरणी संबंधित १९२ दोषी कर्मचारी तसेच त्यांची देयके मंजूर करण्यात सहभागी असणारे लेखाधिकारी, गटविकास अधिकारी व इतर वरिष्ठ अधिकारी यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करावी. अपहारित रक्कम सर्व संबंधितांच्या वेतनामधून तात्काळ वसूल करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यांच्या आत अवगत करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

तसेच विदर्भातील शासकीय कर्मचारी कोकणात, मुंबई येथे तसेच मुंबईतील शासकीय कर्मचारी विदर्भातील गडचिरोली येथे गेल्याचे दर्शवून न केलेल्या प्रवासाची प्रवास देयके सादर करून रजा प्रवास सवलत योजनेचा अवास्तव व अवाजवी फायदा घेतात असे समितीच्या निदर्शनास आले आहे, त्यामुळे शासनाने या बाबींवर आळा घालण्यासाठी प्रचलीत धोरणात बदल करून ज्या ठिकाणी कर्मचारी काम करतात तेथील आस्थापनेकडून त्या कर्मचाऱ्यांची त्यांनी सादर केलेली प्रवास देयके तपासण्यात व त्यांची शहानिशा करण्यात अमूल्य वेळ व पैसा वाया जात असल्यामुळे त्यात कर्मचाऱ्यांचाही वेळ जात असल्याने **रजा प्रवास सवलतीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतन श्रेणीनुसार निश्चित स्वरूपाची एक रकमी रक्कम प्रदान करावी. जेणेकरून राज्य शासनाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याने अवास्तव, अवाजवी व न केलेल्या प्रवासाची देयके शासनास सादर केल्यानंतर त्यांची शहानिशा करण्यासाठी शासनाचा वेळ व पैसा वाया जाणार नाही. अशा प्रकारचा परिपूर्ण तसेच सर्वसमावेशक शासन निर्णय काढण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यांच्या आत सादर करावी, अशीही समिती शिफारस करीत आहे.**

**१.२ अनुसूचित जाती/नवबौद्ध लाभार्थ्यांना ५० टक्के अनुदानावर शेळ्यांचे गट वाटपाबाबत (परिच्छेद क्रमांक ३.७५८) सन २००८-०९ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद क्रमांक ११ -**

सन २००८-०९ या वित्तिय वर्षात घटक योजनेंतर्गत अनुसूचित जाती/नवबौद्ध लाभार्थ्यांना ५० टक्के अनुदानावर शेळ्यांचे गटवाटपासाठी जिल्हा परिषदेला रु. १,४०,००० तरतूद प्राप्त झाली होती व १० शेळी गटाचे भौतिक लक्ष्य होते. खात्याच्या मार्गदर्शक सूचनानुसार प्राप्त तरतूद ८ पंचायत समित्यांना वाटप करण्यात आली आहे. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त गोंदिया यांनी एकूण १४ लाभार्थ्यांच्या निवडीस मान्यता प्रदान करून तांत्रिक मंजुरी दिली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, गोंदिया यांनी एकूण १४ लाभार्थ्यांच्या निवडीस मंजुरी प्रदान केली आहे. परंतु योजनेचे भौतिक लक्ष्य १० शेळी गटाचे असताना त्याकरिता मर्यादित अनुदान १,४०,००० उपलब्ध असताना १४ निवड झालेल्या लाभार्थीपैकी नेमक्या कोणत्या १० लाभार्थ्यांना लाभ दिला याची माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

(२) विभागाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार व महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय, क्र. संकीर्ण १०२००/प्र.क्र.२१२/पदुम-४, दि. १३ ऑगस्ट २००३ अन्वये जारी केलेल्या सुचनानुसार क्र. २(१) मध्ये नमूद केलेनुसार फक्त छोटे कुटुंब संकल्पना राबविणाऱ्या जोडप्यांनाच लाभ द्यावयाचा असताना जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, गोंदिया यांचे पत्र दि. २० नोव्हेंबर २००८ नुसार ६ लाभार्थ्यांपैकी २ लाभार्थी व दि. २१ जानेवारी २००९ चे पत्रान्वये ८ लाभार्थ्यांपैकी २ लाभार्थी असे एकूण ४ लाभार्थी अविवाहित असताना त्यांना प्रत्यक्षात लाभ दिला असेल तर वसूल करून शासनखाती जमा करणे आवश्यक आहे. तसेच श्री. मनोज पुंडलीक सुर्यवंशी खमारी (तिरोडा) यांना ३ अपत्य असताना व शेवटच्या अपत्याचा जन्म दि. ४ ऑगस्ट २००१ चा असताना त्यांना लाभ कसा देण्यात आला याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

(३) विभागाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार लाभार्थ्यांची निवड करताना त्यांचेकडे शेळी पालनासाठी पुरेशी जागा असणे आवश्यक आहे. श्री. अचलकुमार ताराचंद चंद्रीकापुरे, खैरबोडी या लाभार्थ्यांकडे जागा असल्याचे ग्राम पंचायतीचे प्रमाणपत्र व इमारत कर भरल्याची पावती नसताना लाभ कसा काय देण्यात आला. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

(४) पंचायत समिती स्तरावर लाभार्थ्यांना लाभ दिलेबाबत उपयोगिता प्रमाणपत्र लेखा परीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे नेमका कोणत्या लाभार्थ्यांना लाभ दिला याबाबत सत्यता पडताळणी करता आलेली नाही.



**उपरोक्त आक्षेपांसंदर्भात समितीला जिल्हा परिषद, गोंदिया यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा प्राप्त झाला :—**

(१) जिल्हा पशुसंवर्धन उपसंचालक, गोंदिया यांनी एकूण १४ लाभार्थी निवडीस मान्यता प्रदान केलेली असून प्राप्त तरतूद रु. १,४०,००० नुसार भौतिक लक्ष्य १० शेळी गटाचे होते. त्यानुसार १० लाभार्थ्यांना ज्येष्ठतेनुसार अनुदानाच्या मर्यादेत लाभ देण्यात आलेले आहे. लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची यादी नस्ती सोबत आहे.

(२) सन २००८-०९ चे खात्याच्या मार्गदर्शक सूचना पत्र क्र.एसडीएस/१८/१४२८/५५०/१२४५/०८/पंस-१२, पुणे १, दि. ६ जून २००८ अन्वये अविवाहीत लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात येऊ नये असा उल्लेख नाही. ज्या अविवाहित लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे ते कुटुंब छोटे कुटुंब या संकल्पनेत मोडतात. श्री. मनोज पुंडलीक सुर्यवंशी, रा.खमारी,ता.तिरोडा यांना ३ अपत्य असून कु. नेहा, जन्म दि. १४ ऑक्टोबर १९९६, रितीक जन्म दि. ४ ऑगस्ट २००१ व रोहीत जन्म दि. ४ ऑगस्ट २००१ असून रितीक व रोहीत हे जुळे असून त्यांचा जन्म एकाच दिवशी झालेला आहे. त्यामुळे या लाभार्थ्यास लाभ देण्यात आलेला आहे. जुळे असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडण्यात आलेले आहे.

(३) श्री. अचल कुमार ताराचंद चंद्रीकापुरे रा. खैरबोडी, ता. तिरोडा शेळीपालनकरिता जागा असल्याबाबत प्रमाणपत्र प्राप्त करून नस्ती सोबत जोडण्यात आलेली आहे.

(४) पंचायत समिती स्तरावर लाभार्थ्यांना लाभ दिल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र नस्ती सोबत जोडण्यात आलेले आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी याची साक्ष :**

गोंदिया जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ७ जानेवारी २०१४ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने, लाभार्थ्यांचे वाटप अयोग्य रीतीने करण्यात आलेले आहे. तिसरे अपत्य झाले तर लाभार्थी पात्र ठरू शकतो काय, दोन बाळंतपणामध्ये तीन अपत्य झाली तर ते दोन अपत्ये धरायची की, तीन यासंदर्भात विभागाकडून खुलासा का मागविला नाही, शासकीय आदेशानुसार लाभार्थी निवडले गेले नाहीत. खरे म्हणजे हा धोरणात्मक मुद्दा होऊ शकतो. विद्यार्थी १० वी ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्या विद्यार्थ्याला १० वी चा लाभ देता येऊ शकतो काय, शैक्षणिक वर्षे संपल्यानंतर लाभ देता येऊ शकतो काय, अशी पृच्छा लेखा परीक्षक यांना केली असता समितीच्या या मुद्या संदर्भात लेखा परीक्षकांनी खालीलप्रमाणे खुलासा केला आहे.

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, गोंदिया यांनी १४ लाभार्थ्यांच्या निवडीस मंजुरी प्रदान केली. परंतु योजनेचे भौतिक लक्ष्य १० शेळी गटाचे असताना व त्याकरिता मर्यादित अनुदान रुपये १,४०,००० उपलब्ध असताना, १४ निवड झालेल्या लाभार्थ्यांपैकी नेमक्या कोणत्या १० लाभार्थ्यांना लाभ दिला याची माहिती लेखा परीक्षणाच्या वेळी जिल्हा परिषदेकडून उपलब्ध करून देण्यात आली नाही. तसेच दिनांक १३ ऑगस्ट, २००३ अन्वये जारी केलेल्या सुचनेनुसार फक्त छोटे कुटुंब संकल्पना राबविणाऱ्या जोडप्यांनाच लाभ द्यावयाचा असताना व ४ लाभार्थी अविवाहित असताना त्यांना प्रत्यक्षात लाभ देण्यात आला आहे. ३ अपत्ये असताना लाभ देण्यात आलेला आहे. तसेच जुळे जन्माला आल्यानंतर त्या अपत्यांना एक धरले जाते की, दोन अपत्यांपूर्वी एक मूल जन्माला आले व नंतर जुळे झाले तर आपण त्यांना दोन धरणार की तीन, ३ अपत्ये असताना लाभ कसा काय दिला गेला, यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता असल्यामुळे विभागीय अधिकारी यांनी, दोन अपत्ये असतील तरच लाभ दिला जातो. जुळे झाले असेल तर त्यांना दोन अपत्ये म्हटले जाते.

अविवाहितांचे कुटुंब कसे काय होऊ शकते, अविवाहित असेल तर मुलाचे नाव कसे काय लावण्यात आले, अविवाहित असताना लाभ दिला गेला असल्यामुळे त्यांच्याकडून लाभाचे पैसे वसूल करण्याची आवश्यकता आहे, त्यामुळे याबाबतीत शासनाचे नेमके आदेश काय आहेत. याबाबत ग्रामविकास विभागाच्या प्रतिनिधीने दोन अपत्ये असतील तरच लाभ दिला जातो, जुळे असेल तर त्यांना दोन अपत्ये म्हटले जाते असे प्रतिपादन केले.

या विषयाच्या संदर्भात शासन निर्णयाचा खुलासा होणे आवश्यक आहे. चार अविवाहित कुटुंबाला लाभ दिलेला आहे. त्यासंबंधी शासन कोणती कारवाई करणार आहे याची माहिती समितीस प्राप्त झाली नाही.

**समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने खालील मुद्यांसंदर्भात अधिक माहिती मागविली.**

(१) जिल्हा पशुसंवर्धन उप संचालक, गोंदिया यांनी एकूण १४ लाभार्थ्यांच्या निवडीस मंजुरी प्रदान केली आहे. परंतु योजनेचे भौतिक लक्ष १० शेळी गटांचे असताना, त्याकरिता मर्यादित अनुदान रुपये १४०००० उपलब्ध असताना १४ निवड झालेल्या लाभार्थ्यांपैकी नेमक्या कोणत्या १० लाभार्थ्यांना लाभ दिला याची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

(२) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण. १०२००/प्र.क्र.२१२/पदुम-४, दिनांक १३ ऑगस्ट २००३ अन्वये जारी केलेल्या तरतुदीनुसार क्रमांक २ (१) मध्ये नमूद केले नुसार फक्त छोटे कुटुंब संकल्पना राबविणाऱ्या जोडप्यांनाच लाभ द्यावयाचा असताना, जिल्हा पशुसंवर्धन उप संचालक, गोंदिया यांचे पत्र दिनांक २० नोव्हेंबर २००८ चे पत्रानुसार ६ लाभार्थ्यांपैकी २ लाभार्थी व दिनांक २१ जानेवारी २००९ चे पत्रान्वये ८ लाभार्थ्यांपैकी २ लाभार्थी असे एकूण ४ लाभार्थी अविवाहित असताना त्यांना या योजनेत लाभ दिला असेल तर वसूल करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. तसेच, श्री. मनोज पुंडलिक सुर्यवंशी, खमारी (तिरोडा) यांना तीन अपत्य असताना व शेवटच्या अपत्याचा जन्म दिनांक ४ ऑगस्ट २००१ चा असताना त्यांना लाभ कसा देण्यात आला. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.



(३) विद्यार्थी १० वी ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्या विद्यार्थ्याला १० वी चा लाभ देता येऊ शकतो काय, शैक्षणिक वर्षे संपल्यानंतर लाभ देता येऊ शकतो काय, या संदर्भात लेखा परिक्षकांनी माहिती देण्याची आवश्यकता आहे.

(४) श्री. अचलकुमार ताराचंद चंद्रिकापुरे यांच्याकडे किती जागा आहे, १० शेळ्यांसाठी किती जागा लागते.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषद, गोंदिया यांच्याकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

(१) गोंदिया जिल्ह्यात सन २००८-०९ मध्ये विशेष घटक योजनेंतर्गत अनुसूचित जाती/नवबौद्ध लाभार्थ्यांना ५०% अनुदानावर १० शेळ्या + १ बोकड अशा शेळी गटाचा लाभ खालील १० लाभार्थ्यांना देण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | लाभार्थ्यांचे नाव | गांव व तालुका | दारिद्र्य रेषा क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | श्री. प्रीतीलाल सीताराम बोरकर | गिरोला ता. गोंदिया | ५० |
| २ | श्रीमती राधिकाबाई तुळसीराम डोंगरे | सिरपूर ता. गोंदिया | २९ |
| ३ | कु. शेषना पंढरीजी रामटेके | जानवा, ता. अर्जुनी मोरगाव | १४८ |
| ४ | श्री. विकास शामराव शहारे | पलानगांव, ता. देवरी | ७९ |
| ५ | श्री. बाबासाहेब श्रीराम बडोले | मक्काटोला, ता. सालेकसा | ९४ |
| ६ | श्री. अचलकुमार ताराचंद चंद्रिकापुरे | खैरबोडी, ता. तिरोडा | ७९ |
| ७ | श्री. मनोज पुंडलिक सुर्यवंशी | खमारी, ता. तिरोडा | ९८ |
| ८ | श्री. मोरेश्वर ईश्वरदास मेश्राम | बाम्हणी, ता. सडकअर्जुनी | ८९ |
| ९ | श्रीमती अरुणाबाई कुमेंद्र नांदगावे | हिराटोला, ता. गोरेगाव | १४ |
| १० | श्री. माणिकराव झाडु धमगाये | बोरकन्हार, ता. आमगाव | ४९ |

(२) कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १०२००/प्र.क्र.२१२/पदुम-४, दिनांक १३ ऑगस्ट २००३ अन्वये " छोटे कुटुंब " ही संकल्पना राबविणाऱ्या जोडप्यांना योजनेचा लाभ देण्याचे निर्देश आहेत. अपवाद, दारिद्र्यरेषेखालील लाभार्थ्यांना लाभ मिळण्याकरिता 'छोटे कुटुंब' या अटीमुळे ज्या ठिकाणी दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी उपलब्ध होत नसेल त्या ठिकाणी " छोटे कुटुंब " ही अट संबंधित योजनांना लागू करण्यात येऊ नये, अशी तरतूद असल्याने या योजनेंतर्गत लाभ दिलेले उपरोक्त सर्व लाभार्थी हे दारिद्र्य रेषेखालील असल्याने त्यांना या योजनेंतर्गत लाभ शासन निर्णयातील तरतुदीनुसारच देण्यात आलेला आहे.

तसेच सामान्य प्रशासन विभागाची अधिसुचना दिनांक २८ मार्च २००५ मधील अनुक्रमांक २ (घ) (एक) येथे एखाद्या जोडप्यास हे नियम अंमलात येण्याच्या दिनांकाला किंवा त्यानंतर केवळ एकच मुल असेल त्याबाबतीत, नंतरच्या एकाच प्रसुतीत जन्मलेल्या कोणत्याही एका पेक्षा अधिक मुलांना एकच अपत्य म्हणून समजण्यात येईल. तसेच ज्यावेळी एखाद्या जोडप्याला अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास म्हणजेच दिनांक १३ सप्टेंबर २००० रोजी किंवा त्या दिनांकानंतर फक्त एकच मूल असेल आणि त्यानंतरच्या एकाच प्रसुतीमध्ये कितीही मुलांचा जन्म झाला तर ते एकच मुल असल्याचे समजण्यात येईल, अशी तरतूद महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ मधील पृ.क्र. ८० वर अनुक्रमांक (३) येथे असल्याने, श्री. मनोज पुंडलिक सुर्यवंशी, खमारी (तिरोडा) यांना तीन अपत्य असताना व शेवटच्या जुळ्या अपत्याचा जन्म दिनांक ४ ऑगस्ट २००१ चा असला तरीही त्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

निवड करण्यात आलेल्या एकूण १४ लाभार्थ्यांमध्ये ४ लाभार्थी अविवाहित होते. तथापि, यापैकी लाभ देण्यात आलेल्या एकूण १० लाभार्थ्यांमध्ये श्री. बाबासाहेब श्रीराम बडोले व श्री. अचलकुमार ताराचंद चंद्रिकापुरे हे दोन लाभार्थी अविवाहित असले तरीही, त्यांच्या कुटुंबात फक्त वडील, आई व मुलगा असेच सदस्य असल्याने व त्यांचे कुटुंब छोट्या कुटुंबाच्या संकल्पनेमध्ये मोडत असल्याने त्यांना या योजनेंतर्गत लाभ देण्यात आलेला आहे.

(३) श्री. बाबासाहेब श्रीराम बडोले यांचे शिधापत्रिकेवरील वय हे १४ वर्षे दाखविले असले तरी प्रत्यक्षात त्यांचा जन्म दिनांक १४ एप्रिल १९८५ रोजी झाला असल्याने लाभ देतानाचे त्यांचे वय २३ वर्षे होते. तसेच श्री. अचलकुमार ताराचंद चंद्रिकापुरे यांचे शिधापत्रिकेवरील वय हे १९ वर्षे दाखविले असल्याने ते देखील या योजनेचा लाभ देतेवेळी सज्ञान असल्याचे दिसून येते. सबब, लाभ नियमानुसारच दिलेला आहे.

(४) श्री. अचलकुमार ताराचंद चंद्रिकापुरे यांच्याकडे पुरेशी जागा उपलब्ध असून १० शेळ्यांसाठी ३.७५ मीटर लांब आणि २.०० मीटर रुंद (७.५० चौरस मीटर) जागा पुरेशी आहे.



**विभागीय सचिवांची साक्ष :-**

उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने दिनांक २६ जून २०१४ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने शेळी वाटप योजने अंतर्गत घेण्यात आलेल्या लाभधारकांपैकी दोन लाभधारक अविवाहित असताना ते छोट्या कुटुंबाच्या व्याख्येत कसे काय मोडतात तसेच छोट्या कुटुंबाची व्याख्या याचा खुलासा करताना त्या व्याख्येत मुले, पती व पत्नी यांचा समावेश होतो. तसेच मागासवर्गीय, नवबौद्ध आणि दारिद्र्यरेषेखालील लाभार्थी निवडावे लागतात. वडिलांचा दाखला मिळण्यामध्ये अडचण होती. लाभार्थ्यांच्या मुलांकडे शाळेचा दाखला उपलब्ध होता. दोन्ही कुटुंबे लहान होती, त्या कुटुंबातील दोन मुलांच्या नावाने लाभ देण्यात आला आहे, असे विभागीय सचिवांनी समितीसमोर स्पष्ट केले. " १० लाभार्थ्यांपैकी २ अविवाहित लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. परंतु ते २ लाभार्थी ' छोटे कुटुंब ' ह्या संकल्पनेत मोडतात." त्या लाभधारकांना तसा दाखला मिळाला होता. त्यानुसार त्यांना लाभ देण्यात आला होता. अविवाहित मुले कुटुंबात असतील तर ती मुले त्याच कुटुंबात मोडतात व त्या लाभार्थ्यांना शाळेचा दाखला मिळालेला असल्यामुळे त्यांना लाभ देण्यात आला होता. लाभार्थी श्री. अचलकुमार ताराचंद चंद्रिकापुरे याच्या कुटुंबातील पती-पत्नी व त्यांच्या मुलांना लाभ दिलेला आहे. त्यांच्या आई-वडिलांकडे जातीचा दाखला नव्हता, परंतु मुलांच्या शाळेच्या दाखल्यामुळे त्यांना लाभ दिलेला आहे. तथापि, शासन निर्णयात अशी तरतूद नाही आणि प्रत्येक गोष्ट शासन निर्णयामध्ये समाविष्ट करणे शक्य होत नाही. परंतु या योजनेमध्ये काही गैरव्यवहार झालेला नाही. प्रत्येक प्रकरणाबाबत सहानुभूतीने विचार करावयाचा झाल्यास शासन निर्णयामध्ये अनेक दुरुस्त्या कराव्या लागतील, त्यामुळे दुरुस्त्यांची संख्या जास्त होण्याची शक्यता आहे. तथापि समितीने शिफारशी केल्यानंतर या बाबींचा शासन निर्णयामध्ये समावेश केला जाईल असा खुलासा विभागीय सचिवांकडून करण्यात आला.

**अभिप्राय व शिफारशी :-**

शेळी वाटप योजनेचे भौतिक लक्ष १० शेळी गट व मर्यादित अनुदान रुपये १,४०,००० असताना जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, गोंदिया यांनी प्रत्यक्षात १४ शेळी गट लाभार्थ्यांची निवड केली होती. तथापि, निवडलेल्या १४ लाभार्थ्यांपैकी नेमक्या कोणत्या १० लाभार्थ्यांना लाभ दिला याची माहिती लेखा परिक्षणाच्या वेळी अप्राप्त होती.

दिनांक १३ ऑगस्ट २०१३ रोजीच्या अधिसुचनेन्वये ' छोटे कुटुंब ' या संकल्पनेनुसार असलेल्या कुटुंबानाच या योजनेचा लाभ द्यावयाचा असताना प्रत्यक्षात योजना राबविताना ४ अविवाहित, लाभार्थी तसेच ३ अपत्ये असलेल्या एका कुटुंबास या योजनेचा लाभ देण्यात आल्याची माहिती समितीसमोर आली आणि या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्याचे मत समितीने प्रतिपादन केले.

या लाभार्थ्यांपैकी श्री. अचलकुमार ताराचंद चंद्रिकपुरे यांच्या कुटुंबातील आई व वडील यांच्याकडे जात प्रमाणपत्र नसल्यामुळे त्यांना त्यांच्या मुलांच्या शाळेच्या दाखल्याच्या आधारे लाभ देण्यात आलेला होता. तथापि, अशी तरतूद शासन निर्णयात नाही.

प्रत्येक शासकीय योजनांचे लाभ छोट्या कुटुंबाला देण्याबाबतची तरतूद शासन निर्णयात आहे. तथापि, छोट्या कुटुंबाच्या व्याखेमध्ये पती-पत्नी व दोन मुले अशी नोंद आहे. आणि, जर जुळी मुले जन्माला आली तर त्यांना एक व्यक्ती म्हणून की दोन अविवाहित मुले म्हणून लाभ द्यायचा याचा सुस्पष्ट खुलासा होणे गरजेचे आहे, असे मत समितीने व्यक्त केले.

**या प्रकरणी, भविष्यात अशाप्रकारचे लाभ लाभार्थ्यांना देताना शासनास कोणत्याही प्रकारे अडचण येऊ नये त्यास्तव योजना लागू करण्यात विलंब होणे वा चुकीच्या पद्धतीने ती राबविल्यामुळे शासनाची अडचण होऊ नये यासाठी 'छोटे कुटुंब' या संकल्पनेबाबत त्याचप्रमाणे जुळी मुले जन्माला आल्यास अशा लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत शासन स्तरावर सर्वंकष निर्णय घेण्यासाठी शासनाच्या संबंधित विभागानी समन्वय साधून विधी व न्याय विभागाचा सल्ला घेण्यात यावा व त्यानुसार साक्षीच्या अनुषंगाने उक्त कुटुंबाच्या व्याख्या नव्याने करून त्यात त्रुटी असलेल्या बाबींचा समावेश करून त्याचा क्षेत्रीय स्तरावर दुरुपयोग होणार नाही याची दक्षता घेऊन साक्षीच्या वेळी उपस्थित झालेल्या प्रत्येक मुद्यास न्याय मिळेल आणि राज्यातील प्रत्येक गरजू व पात्र लाभार्थ्याचे योग्य ते हित साधले जाईल असा स्वयंस्पष्ट, परिपूर्ण व सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित करावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**



**१.३ ६ महिने ते १ वर्ष तसेच ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील कुपोषित मुलांना पौष्टिक आहार म्हणून नाचणी, खीर पुरविण्याबाबत (परिच्छेद क्रमांक ३.९८६) सन २००८-२००९ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालावरील परिच्छेद क्रमांक २-**

वरील पौष्टिक आहार नाचणीसाठी रक्कम रुपये ८,८६,४१२ खर्च करण्यात आले. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :—

(१) उपचार शास्त्रभूत आहारपुरवठा महालक्ष्मी गृह उद्योग, नांदेड करत होते. तथापि सन २००८-०९ मध्ये कोणत्या पुरवठा धारकाकडून सदर साहित्य खरेदी करावयाचे याबाबत शासनाचे आदेश व करारनामा प्राप्त नसताना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी परस्पर जिल्हाधिकारी व समितीची मंजुरी घेऊन खर्च केलेला आहे. शासनाची मंजुरी घेण्यात आलेली नाही.

(२) महाराष्ट्र शासन निर्णय उद्योग व कामगार विभाग क्र. भाखंस/१०८८/(२५१२)/उद्योग-६, दिनांक २ जानेवारी १९९२ आणि समक्रमांकित शासन निर्णय दिनांक ३० मार्च १९९४ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार खरेदी करण्यात आली नाही.

(३) फक्त ५० दिवस उपचार शास्त्रभूत आहार दिल्याने कुपोषण किती प्रमाणात कमी झाले. संबंधितांना किती लाभ झाला याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त केलेले नाहीत.

(४) महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय, क्र.एक.वि.०६/प्र.क्र.११८/का-५, दिनांक १ जून, २००७ नुसार मूल्यवर्धित कर भरणे आवश्यक असताना रक्कम रुपये ८,८६,४१२ च्या २ टक्के मूल्यवर्धीत कराची रक्कम रुपये १७,७२८ कपात करण्यात आली नाही. वसूल करून योग्य लेखा शिर्षात रक्कम जमा करणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपांसंदर्भात समितीला जिल्हा परिषद गोंदिया यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—

(१) महालक्ष्मी गृह उद्योग, नांदेड यांचेकडून उपचार शास्त्रभूत आहाराचा पुरवठा पुरवठाधारकाकडून बंद झाल्यामुळे सन २००८-०९ मध्ये उपचार शास्त्रभूत आहाराचा पुरवठा झालेलाच नाही. शासनाचे परिपत्रक दिनांक २८ ऑक्टोबर २००५ अन्वये ६ महिने ते १ वर्ष व ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील कुपोषित मुलांसाठी पाककृती २८ नुसार नाचणीचा दर जिल्हाधिकारी पोषण आहार समिती यांचेकडून मंजुरी घेऊन महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचे शासन निर्णय क्र. २३ मे २००७ नुसार कार्यालयास आवश्यक असणारी स्टेशनरी,

उपकरणे, शालेय साहित्य तसेच इतर नित्योपयोगी वस्तुची खरेदी महाराष्ट्र को-ऑप.कंझुमर्स फेडरेशन मर्यादित, मुंबई या संस्थेकडून प्राधान्याने खरेदी करावी असे नमूद केले आहे. या आधारावर महाराष्ट्र को-ऑप. कंझुमर्स फेडरेशनला पुरवठा आदेश दिलेला होता. शासनाच्या निकषाप्रमाणेच खरेदी केली आहे.

(२) शासनाच्या ध्येय धोरणानुसारच खरेदी केलेली आहे.

(३) उपयोगिता प्रामाणपत्र प्राप्त करून घेतले असून ते नस्तीस संलग्न आहेत.

(४) मूल्यवर्धित कराच्या नियमावलीतील ९(अ) नुसार खाद्य प्रक्रियेशी संबंधित बाबींवर मूल्यवर्धीत करात सूट असल्यामुळे मूल्यवर्धित कराची रक्कम कपात करण्यात आलेली नाही.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

गोंदिया जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ७ जानेवारी २०१४ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी उपचार शास्त्रभूत महालक्ष्मी गृह आहार पुरवठा, नांदेड यांच्याशी करारनामा केला होता. आहार पुरवठा करून कुपोषित मुलांमध्ये वाढ होऊ नये हे उद्दिष्ट होते. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पोषण आहार समितीची बैठक घेण्यात आली. शासन निर्णय दिनांक २८ ऑक्टोबर २००५ मधील क्रमांक ५ नुसार को-ऑ.कन्झुमर फेडरेशनकडून खरेदी करण्याचे निर्देश दिले. शासन निर्णयामध्ये म्हटले आहे की, वाटाघाटी कराव्यात व त्यानुसार दर निश्चित करावेत. त्याप्रमाणे समितीने दर निश्चित केले होते. दिनांक १ डिसेंबर २००८ रोजी याकरिता बैठक झाली होती. त्या अनुषंगाने नाचणी खीर मुलांना पुरविण्यात आली. दिनांक ३१ मार्च २००८ पासून पुरवठा बंद होता. मार्च महिन्यामध्ये १५ दिवसांकरिता ऑर्डर दिली होती अशी माहिती जिल्हा परिषदेकडून समितीस प्राप्त झाली. नाचणी खरेदीसाठी ८ लाख ८६ हजार ४१२ रुपये खर्च करण्यात आले, परंतु त्यावर व्हॅट लावलेला नाही. व्हॅट अधिनियमातील अनुसूची ३७ नुसार चार टक्के व्हॅट लागतो. त्याप्रमाणे एकूण ३५ हजार ५५६ रुपये वसूल करणे आवश्यक आहे असे मुख्य लेखा संचालक यांनी समितीस विषद केले.

त्यावर्षी उपचार शास्त्रभूत आहार बंद होता, परंतु त्यांना अंगणवाड्यांचा नियमित आहार सुरू होता या जिल्हा परिषदेच्या खुलाशावर पुरवठादाराने आहाराचा पुरवठा केला नाही तर कोणती पर्यायी व्यवस्था आहे या समितीच्या प्रश्नास, या संदर्भात दिनांक २८ ऑक्टोबर २००५ चा शासन निर्णय आहे. जर आहाराचा पुरवठा होत नसेल तर जिल्हा आहार समितीने त्या जिल्ह्यासाठी पाककृती निश्चित करावयाची आहे. असा जिल्हा परिषदेकडून खुलासा प्राप्त झाला.



**१.४ पुरक पोषण आहार पुरवठ्याबाबत (परिच्छेद क्रमांक ३.९८७) सन २००८-२००९ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालावरील परिच्छेद क्र.३ -**

पुरक पोषण आहार पुरवठाबाबत रक्कम रुपये ९३,१४,२१६ खर्च करण्यात आले. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :—

(१) सन २००८-०९ मध्ये मंजूर तांदूळ पैकी (५००-३१३.२२) १८६.७८ क्विंटल तांदळाची उचल करण्यात आलेली नाही. तसेच प्रकल्प आमगाव व गोरेगाव येथे तांदळाची वाहतुकीबाबत आदेश देण्यात आलेले नाही. महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक क.शि.२००५/प्र.क्र.१४१/का-५, दिनांक १९ मे २००६ मधील पाककृती आठवड्यातून तीन दिवस तांदळाचे पदार्थ देणे आवश्यक आहे. तरी तशी कार्यवाही झालेली नाही व त्यामुळे प्रकल्प आमगाव व गोरेगाव येथे योजना शासन निर्देशानुसार राबविण्यात आली नाही.

(२) उशिरा पुरवठा बचत रक्कम रुपये ४२,७४० दंड पुरवठाधारकाकडून वसूल करण्यात आले नाही. वसूली होणे आवश्यक आहे.

(३) पुरवठादाराने पुरवठा न केलेल्या सोया फ्लोअर, मीठ व हळदीचे चाचणी अहवाल प्राप्त केलेले आहेत. प्रकल्प स्तरावरून साहित्य चाचणीसाठी पाठविलेले नसताना चाचणी अहवाल बिजकासोबत सादर करण्यात आले आहे.

(४) एकात्मिक बाल विकास सेवा योजना मुंबई यांचे पत्र क्र.२०११/०७, दिनांक ५ ऑक्टोबर २००७ अन्वये दिनांक १ एप्रिल २००५ पासून मूल्यवर्धीत कर भरणे आवश्यक आहे. त्यामुळे रुपये ९३,१४,२१६ चे २ टक्के मूल्यवर्धीत कराची रक्कम रुपये १,८६,२८४ वसूल होणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपांसंदर्भात समितीला जिल्हा परिषद, गोंदिया यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—

(१) जिल्हाधिकारी गोंदिया यांचे पत्र क्रमांक २२ मे २००८ नुसार ५०० क्विंटल तांदळाचा पुरवठा करण्यात आला. त्यापैकी ३१३.२२ क्विंटल तांदूळ कंझुमर्स फेडरेशन यांनी उचल करून ज्या अंगणवाड्यामध्ये बचत गटाकडून पुरवठा होत नाही अशा अंगणवाड्यामध्ये पुरवठा केला आहे व उर्वरित तांदूळ ज्या अंगणवाड्यामध्ये बचत गटामार्फत पुरवठा केला जातो अशा अंगणवाड्यांना रेशन दुकानामार्फत पुरवठा केलेला आहे. प्रकल्प आमगाव व गोरेगाव येथे बचत गटामार्फत आहाराचा पुरवठा होत असल्यामुळे फेडरेशनकडून तांदळाची वाहतूक सदर प्रकल्पांना करण्यात आली नाही. फेडरेशनकडून पुरवठा करण्यात आला नसला तरी सदर प्रकल्पामध्ये

आहाराचा पुरवठा बचत गटामार्फत झालेला आहे. त्यामुळे प्रकल्प आमगाव व गोरेगाव येथे शासन निर्देशानुसार योजना राबविण्यात आली आहे. सदर बालविकास प्रकल्प अधिकारी यांचेकडून त्याबाबत प्रमाणपत्र घेतले असून नस्तीस संलग्न आहे.

(२) या कार्यालयाचे पुरवठा आदेश क्रमांक ५१२/२००८,दिनांक १४ ऑगस्ट २००९ नुसार सोयाबिन फ्लोअरचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. पाककृतीमध्ये सोयाबिन फ्लोअरमध्ये प्रथिने जास्त असल्यामुळे ते पुरवठा करण्याकरिता आदेशित केले होते. परंतु सोयाबिन फ्लोअर उपलब्ध नसल्यामुळे फेडरेशनने सोयाबिन फ्लोअरचा पुरवठा केला नाही. त्यामुळे सोयाबीन फ्लोअरची रक्कम फेडरेशनला देण्यात आलेली नाही. त्याकरिता दंड आकारण्यात आला नाही.

(३) सडक/अर्जुनी प्रकल्पात पुरवठाधारकाने सोयाबिन फ्लोअरचा पुरवठा केलेला नाही. चाचणी अहवालात बाकी प्रकल्पाप्रमाणेच सोयाबिन फ्लोअरची टेस्टींगबाबत अहवाल सादर केल्याचे दिसून येते. तसेच मोर/अर्जुनी मध्ये टेस्टींग अहवाल दिनांक १६ सप्टेंबर २००८ ला पाठविले होते. दिनांक १७ सप्टेंबर २००८ ला टेस्टींग करून पत्र क्र. १८४/२००८, दिनांक १८ सप्टेंबर २००८ ला परत पाठविले आहे. हळद व मीठाचा उल्लेख टेस्टींग रिपोर्टमध्ये प्रयोगशाळा, नागपूर यांनी केल्याचे दिसून येते. यामध्ये या कार्यालयाकडून कोणतीही चूक झालेली नाही व पुरवठा न झालेल्या साहित्याचे देयक सुद्धा काढण्यात आलेले नाही.

(४) मूल्यवर्धित कराच्या नियमावलीतील ९ए नुसार खाद्य प्रक्रियेशी संबंधित बाबींवर मूल्यवर्धित करात सुट असल्यामुळे मूल्यवर्धित कराची रक्कम कपात करण्यात आलेली नाही.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :—**

गोंदिया जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०७ जानेवारी २०१४ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी दोन विभागांचे दोन वेगवेगळे निर्णय आहेत. त्यांपैकी एका विभागाचे असे म्हणणे आहे की, खाद्य प्रक्रियेशी संबंधित बाबीवर व्हॅटमध्ये सूट आहे तर दुसऱ्या विभागाचे म्हणणे आहे की, व्हॅट आकारता येतो. तेव्हा दोन्ही विभागांनी अंतिम निर्णय तपासून घेतो असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांच्याकडून सांगण्यात आले. त्यावर व्हॅट अधिनियमातील कलम ३७ नुसार ४% व्हॅट लागू होतो. त्याप्रमाणे व्हॅट घेतलेला नाही असा संचालक, स्थानिक निधी व लेखा यांनी खुलासा केला. अगोदर व्हॅट कापून घ्यावा लागतो हे बरोबर आहे. त्यानंतर समोरच्या पुरवठादाराने मागणी केल्यानंतर त्याची पूर्तता करावी लागते. तेव्हा पुरवठादाराला व्हॅटमध्ये दिलेली सूट योग्य नाही असे विभागीय



अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. यासंदर्भात संबंधित कंत्राटदाराकडून १०० टक्के वसूली करावी लागणार आहे. परंतु यासंदर्भात शासनाने पाठपुरावा करण्याची गरज समितीने प्रतिपादन केली.

**विभागीय सचिवांची साक्ष (परिच्छेद क्र.३.९८६ व ३.९८(७) :-**

उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने दिनांक २६ जून २०१५ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची उपरोक्त मुद्दा क्रमांक ३.९८६ व ३.९८७ बाबत एकत्रित साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने, कुपोषित मुलांना पौष्टिक आहार म्हणून नाचणी व खीर पुरविण्याबाबत सन २००८-०९ मध्ये शासनाची मंजुरी न घेण्याची कारणे काय आहेत, पुरवठादाराने आहाराचा पुरवठा केला नाही तर कोणती पर्यायी व्यवस्था करण्यात येते व शासनाचे उपचार शास्त्रभूत आहार पुरवठ्याबाबत निश्चित धोरण काय आहे, याबाबत माहिती मागितली. त्याची माहिती देताना विभागीय सचिवांनी, सध्या उपचार शास्त्रभूत आहार पुरवठा पुरविला जात नाही. ० ते ३ वर्षांपर्यंतची मुले अंगणवाड्यांमध्ये पोहोचू शकत नाहीत किंवा जात नाही. ३ वर्षांवरील मुले अंगणवाड्यांमध्ये जातात. ३ वर्षांच्या आतील मुलांसाठी टीएचआर हा पर्याय अवलंबिलेला आहे. त्यात मायक्रो न्युट्रिएंट युक्त शिरा, उपमा व सत्तू मिश्रित टीएचआर पुरविण्यात येतो. टीएचआरमध्ये ते रेडी मिक्स असते. अंगणवाडीमध्ये रोज येऊ शकत नाहीत अशा मुलांसाठी आहार म्हणून त्यांची आई घरामध्ये गरम पाण्यात ही पावडर शिजवू शकते असा खुलासा केला.

समितीने पुढे ठेकेदार एकाच वेळी ठराविक ठिकाणी मालाचा पुरवठा करतो. तेथून जिल्हा परिषदेमार्फत तालुक्याच्या ठिकाणी पुरवठा केला जातो. प्रत्यक्षात गावामध्ये तीन-तीन महिने आहार पुरवठा होत नाही. त्या अनुषंगाने पर्यायी व्यवस्था आहे काय, याबाबत माहिती मागितली. ती देताना विभागीय सचिवांनी, टीएचआर सेल्फलाईन असतो. दीड ते दोन महिन्यात अंगणवाडी स्तरावर पुरवठा होतो. अंगणवाडी सेविकांमार्फत तो लाभार्थ्यांना पुरविण्यात येतो. क्वचित ठिकाणी विलंब होत असेल तर हॉट कूकचा पर्याय उपलब्ध आहे. ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांना गरम ताजा आहार दिला जातो. हा पर्याय दर दिवशी उपलब्ध असतो. विलंब झाला तर दुसऱ्या पर्यायाचा अवलंब करू शकतात, असा खुलासा केला.

**अभिप्राय व शिफारशी (परिच्छेद क्र.३.९८६ व ३.९८(७) :-**

आहाराअभावी कुपोषित मुलांच्या संख्येत वाढ होऊ नये यासाठी महालक्ष्मी गृह आहार पुरवठा, नांदेड यांचे सोबत जिल्हा परिषदेने करार केला होता. त्यांच्याकडून मुलांसाठी नाचणी, खीर पुरवठा होणार होता. नाचणी खरेदीसाठी रक्कम रु. ८,८६,४१२ सदर ठेकेदारास देण्यात आली. तथापि,

त्यावरील ४% दराने मूल्यवर्धित कराची (व्हॅट) वजावट करण्यात आली नाही. त्या कराची एकूण रक्कम रु. ३५,५५६ एवढी होत होती.

तथापि, दिनांक ३१ मार्च २००८ पासून ठेकेदाराने आहार पुरवठा बंद केला. ३ वर्षांवरील मुले अंगणवाडीमध्ये जातात, त्यामुळे त्यांना तेथे पौष्टिक आहार मिळतो. तथापि, ० ते ३ वर्षे वयोगटातील मुलांना अंगणवाडीमध्ये प्रवेश मिळत नसल्यामुळे त्यांना उपचार शास्त्रभूत आहार उपलब्ध होत नाही. त्यासाठी त्यांना टिएचआर म्हणजेच मायक्रो न्युट्रिएंट युक्त शिरा, उपमा वा सत्तू मिश्रित आहार पुरविण्यात येतो.

आहार पुरवठा होत नसेल तर जिल्हा आहार समितीने पाककृती निश्चित करणे आवश्यक असते. कारण पुरवठा ठेकेदार जिल्हा परिषदेमार्फत तालुक्याच्या ठिकाणी एकाच वेळी करतो, त्यामुळे प्रत्येक गावांमध्ये तो पोहोचण्यासाठी ३-३ महिन्यांचा विलंब होतो. त्यास्तव आहाराअभावी तीन वर्षांखालील मुले कुपोषित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी शासनाने हॉटकुकचा पर्याय उपलब्ध करून दिलेला आहे. **तथापि, त्याची माहिती अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मतदनीस यांना देण्यात आलेली नसल्यामुळे आयएसडीएस योजनेचा हेतू सफल होऊ शकत नाही. अंगणवाड्यांसाठी दिलेला निधी आहे तो ही अपूर्ण आहे, त्यामुळे त्यात पुरेशी वाढ होणे गरजेचे आहे असे समितीचे मत आहे.**

**यास्तव टीएचआर आहार नियमितरित्या जिल्ह्याच्या सर्व ठिकाणी वेळेवर पुरविण्याबाबतच्या सुचना सर्व जिल्हा परिषदांना तात्काळ निर्गमित करण्यात याव्यात. त्याचप्रमाणे टिएचआर हा काही विशिष्ट परिस्थितीमध्ये व अपरिहार्य कारणास्तव लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यास विलंब होत असेल तर त्यास हॉटकूकचा पर्याय शासनाने उपलब्ध करून दिलेला असून देखील सदर योजना राबविणाऱ्या यंत्रणेसह ही योजना माहीत नसल्याकारणाने या योजनेची माहिती, यंत्रणा तसेच लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी व्यापक स्वरूपात प्रसार व प्रचार करण्यात यावा. सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी पुरेशा निधीची तरतूद करून सदर निधी विहित कालावधीत संबंधितांना मिळावा, तसेच सर्व संबंधित अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना सकस आहार कसा द्यावा याबाबत दरवर्षी प्रशिक्षण देण्याबाबत कार्यशाळा आयोजित करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यांत कळविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**



**मूल्यवर्धित कर (व्हॅट) लागू करावा अथवा नाही याबाबत राज्य शासनाच्या दोन विभागांमध्ये दुमत असल्याचे समितीस आढळून आले. तसेच अद्याप ठेकेदाराकडून वसूल न केलेली रु. ३५,५५६ एवढ्या रकमेचा मूल्यवर्धित कर (व्हॅट) वसूलीसाठी पाठपुरावा करून ती रक्कम लवकरात लवकर वसूल करावी व वरील प्रकरणी केलेल्या संपूर्ण कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**१.५ सन २००९-१० या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (परिच्छेद क्रमांक ३.१०३(६) सन २००९-२०१० च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालावरील परिच्छेद क्र.२७ -**

सन २००९-१० या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी -

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरूप | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ५ | अपहार प्रकरणे | गोंदिया | सामान्य प्रशासन विभाग | २७ | ८९९६६१ |

**उपरोक्त आक्षेपांसंदर्भात जिल्हा परिषद गोंदिया यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा प्राप्त झाला आहे.**

सन २००९-१० मध्ये अफरातफरचे ७८ प्रकरणात रु. ८,९९,६६०.९५ एवढी रक्कम गुंतलेली आहे. त्यापैकी मार्च, २०१३ अखेर रु. २,७०,७९१.४९ एवढी रक्कम ३६ प्रकरणांत वसूल झालेली असून रु. ६,२८,८६९.४६ एवढ्या रकमेची ४२ प्रकरणे वसूली अभावी प्रलंबित आहेत. वसूलीची कार्यवाही सुरू आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

गोंदिया जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. त्यावर खुलासा करताना, सन २००९-२०१० मध्ये अफरातफरीच्या ७८ प्रकरणात रु. ८,९९,६६० एवढी रक्कम गुंतलेली होती. माहे मार्च २०१३ अखेर रु. २,७०,७९१ एवढी रक्कम ३६ प्रकरणात वसूल झालेली असून रु. ६,२८,८६९ एवढी रक्कम ४२ प्रकरणातून वसूल होणे प्रलंबित आहे. ग्रामसेवकाने अपहार केल्यानंतर कोणती कारवाई करण्यात येते, याबाबत समितीस खुलासा करताना लेखापरीक्षण झाल्यानंतर सर्व माहिती जिल्हा परिषदेस कळवली जाते. त्यानंतर पुन्हा चौकशी केली जाते. चौकशी झाल्यानंतर जबाबदारी निश्चित करून, गांभीर्य पाहून योग्य ती कारवाई निश्चित केली जाते, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले. अपहाराच्या प्रकरणात आतापर्यंत किती एफआयआर दाखल करण्यात आले आहेत याची पंचायत समिती निहाय माहिती न देता फक्त गोंदिया पंचायत समितीमध्ये



१४ प्रकरणे होती, त्यांपैकी १२ प्रकरणांची चौकशी करून जिल्हा परिषदेला पाठविण्यात आलेली आहेत असे समितीस सांगण्यात आले. यांमध्ये १९९२, १९९३, १९९७, १९९९, २००२ ची जुनी प्रकरणे सुद्धा आहेत. उपलब्ध माहितीनुसार ७८ प्रकरणांत एकूण १० जणांना निलंबित करण्यात आले आहे. काही जणांवर कारवाई देखील झालेली आहे. त्यामुळे या प्रकरणांमध्ये सरळ प्रकरणे (केसेस) दाखल करण्याची समितीने प्रतिपादन केलेली आवश्यकता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्य केली.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २६ जून २०१४ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने, सन २००९-१० या अहवाल वर्षात एकूण ७८ प्रकरणांमध्ये किती प्रकरणांची वसूली करण्यात आली आणि किती प्रकरणे प्रलंबित आहेत, अपहार प्रकरणी आतापर्यंत किती जणांवर एफआयआर दाखल करण्यात आले, अपहार करणाऱ्या ग्रामसेवकांचा चौकशी अहवाल मागील वर्षी उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे पाठविला असून या प्रकरणी निर्णय का घेण्यात आला नाही, ज्या ग्रामसेवकांवर अविश्वास दाखविण्यात आला आहे, अशा ग्रामसेवकांची पुन्हा त्याच ठिकाणी बदली का करण्यात आली, या जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली, याबाबत विचारणा केली असता याची समितीस माहिती देताना अशी एकूण ७५ प्रकरणे आहेत. यांपैकी ४२ प्रकरणे प्रलंबित होती, त्यामध्ये ६ लाख ६७ हजार रुपयांची वसूली करावयाची होती. यात विविध स्वरूपाची प्रकरणे आहेत. पैशांची अफरातफर, अपहार, काही लोकांनी अग्रिम घेतला, परंतु त्याचा त्यांनी हिशोब दिला नाही. काही लोकांनी कोर्टाच्या कामासाठी पैसे घेतले, परंतु त्यातील शिल्लक पैसे परत दिले नाहीत. असा समितीसमोर खुलासा केला तसेच बदली केलेल्या ग्रामसेवकाच्या पुनः उक्त ठिकाणी झालेल्या बदलीबाबत तपास करण्यात येईल अशी विभागीय सचिवांनी ग्वाही दिली. एकूण ८ पंचायत समिती अंतर्गत सन २००८-०९ अखेर १ कोटी २२ लाख २७ हजार पैकी ५१ टक्के वसूली केली आणि उर्वरित थकबाकी आहे. तसेच ४२ प्रकरणांमध्ये ६ लाख ६७ हजार रुपयांची वसूली करावयाची होती, त्यांपैकी १७ प्रकरणे निकाली काढण्यात आली. त्यातून १ लाख १५ हजार रुपये वसूल झाले. बाकीच्या पाच गावांची वसूली ५ लाख ५१ हजार रुपयांची आहे, त्यापैकी ४ लाख ३६ हजार रुपयांची वसूली बाकी आहे. त्यामध्ये गुंतलेले काही कर्मचारी मयत झाले आहेत. तर काही कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. तसेच काही कर्मचारी हे हयात असून अशा संबंधित दोषी कर्मचाऱ्यांकडून अपहाराची रक्कम वसूल केली जाणार आहे अशी समितीस माहिती देण्यात

आली. पंचायत समिती, गोंदिया येथील रोख पुस्तक लिहिण्यातील अनियमिततेबाबत रोखपाल व गट शिक्षणाधिकारी यांच्याकडून धनादेशाद्वारे व्यवहार झालेला होता. या प्रकरणी संबंधितांची वेतनवाढ थांबविलेली आहे.

**अभिप्राय व शिफारशी :—**

सन २००९-२०१० या वर्षात जिल्हा परिषदेअंतर्गत झालेल्या अफरातफर, अग्रिम घेऊन हिशोब न देणे तसेच कोर्ट कचेरीच्या कामासाठी घेतलेल्या पैशातील शिल्लक रक्कम न देणे अशा एकूण ७८ प्रकरणांपैकी ४८ प्रकरणी अद्याप वसूली प्रलंबित आहे. त्या वसूलीची रक्कम ६ लाख ६७ हजार एवढी होती. त्यापैकी १७ प्रकरणे निकाली काढण्यात आली व त्याद्वारे रु. १ लाख १५ हजार वसूल करण्यात आले होते.

अपहार केलेली रक्कम जर वेळीच वसूल होत नसेल तर ही बाब योग्य नाही अशी समितीने खंत व्यक्त केली आणि या प्रकरणी विभागीय नियंत्रण ठेवण्याची गरज प्रतिपादीत केली.

**सबब, समिती शिफारस करते की, उर्वरित सुमारे रु. ५.५२ लाख रक्कम तात्काळ वसूल करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल समितीकडे एक महिन्याच्या आत तात्काळ पाठविण्यात यावा.**



## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

**२.१ मागासवर्गीय महिलांना शिलाई मशिन पुरविण्यासाठी अर्थसहाय्य (परिच्छेद क्रमांक ३.७८(६) जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग सन २००८-०९ (परिच्छेद क्रमांक ०(९) -**

सन २००८-२००९ या वर्षाच्या लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवालातील (परिच्छेद क्र.०(९) सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या २० टक्के सेस अनुदानातून मागासवर्गीय महिलांना शिलाई मशिन वाटप करण्याची योजना राबविली असून त्यावर रक्कम रुपये ८९,५०५ इतका खर्च केलेला आहे याबाबत लेखापरीक्षकांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत :—

(१) ग्रामपंचायत विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास. १०८४/सीआर-१६३३/५७, दिनांक २१ जानेवारी १९८५ व शासन परिपत्रक ग्रामविकास विभाग क्र. पंरास. १०८४/सीआर-१६६३-५८७, दिनांक १९ जानेवारी १९९५ नुसार लाभार्थी हिस्सा वसूल केल्याशिवाय लाभ देऊ नये वा वस्तूची खरेदी करू नये असे असताना लाभ दिलेला आहे.

(२) वेंगुर्ले गटाकडील १७ व मालवण गटाकडील १ असे एकूण १८ शिलाई मशिन्सची १० टक्के प्रमाणे हिस्स्याची रक्कम लेखापरीक्षण कालावधी पर्यंत जमा नसल्याचे दिसून आले त्यामुळे १८ लाभार्थ्यांची रुपये १३,७७० संबंधित गटांनी १० टक्के हिस्सा रक्कम जमा न करता वाटप केल्याने नियमबाह्यता झालेली आहे.

(३) योजनेतील १३० लाभार्थ्यांना शिलाई मशिन्स वाटप करण्यात आलेल्या असताना त्यांच्या वैयक्तिक पोहोच पावत्या पंजिकेसोबत ठेवलेल्या नाहीत.

(४) पुरवठा ठेकेदाराला दिलेल्या पुरवठा आदेशामध्ये सदरचा पुरवठा गटस्तरावर करावयाचा होता. जर शर्ती व अटींप्रमाणे गटस्तरावर पुरवठा करण्यात आला होता, तर विभागीय कार्यालयाचे साठा रजिस्टर पृष्ठ क्रमांक ७४ वर त्यांची नोंद का व कोणत्या हेतुने केली आहे याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

(५) गट स्तरावर वाटप केलेल्या शिलाई मशिन्सची तांत्रिक दृष्ट्या तपासणी केलेबाबत तांत्रिक अधिकाऱ्याचा अहवाल प्राप्त करून घेतलेले नाहीत.

(६) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.झेडपीए. २०००/प्र.क्र.४१/३३, दिनांक १७ जानेवारी २००१ अन्वये योजनेची निवड व अंमलबजावणीची रुपरेषा ३० जून पर्यंत अंतिम करणे आवश्यक असून लाभार्थ्यांची निवड व खरेदी प्रक्रिया ३० सप्टेंबर पर्यंत पूर्ण होणे आवश्यक असताना तशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही.

(७) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. मागास. १०६३/प्र.क्र.१२३९/३४, दिनांक ०१ सप्टेंबर १९९३ नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वित्तीय वर्षात साहित्य वाटप करावयाचे आहे. तथापि प्रत्यक्षात शिलाई मशिन्सचे वाटप त्याच वर्षात (सन २००८-२००(९) मध्ये झालेले नाही.

(८) सदर योजनेअंतर्गत महिलांना जर अर्थ सहाय्य करणेचे होते तर संबंधित लाभार्थी महिलांना प्रत्यक्षात शिलाई मशिन्सची खरेदी का करून देण्यात आली याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

(९) शासन निर्णय दिनांक २० ऑक्टोबर १९९९ मधील तरतूदीनुसार लाभार्थ्यांचे नाव दारिद्र्यरेषेखालील कुटुंब यादीत असणे आवश्यक असताना त्याची नोंद मूळ मंजूर प्रस्तावात का करण्यात आली नाही याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

वरील आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी स्वरूपात खुलासा कळविण्यात आला :—

(१) मंजूर केलेल्या लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यापूर्वी १०% लाभार्थी हिस्सा वसूल करून साहित्य वाटप करणेत आलेले आहे व वसूल केलेली रक्कम जिल्हा परिषद खात्यात चलनाने जमा करणेत आलेली आहे.

(२) १०% लाभार्थी हिस्स्याची रक्कम लाभार्थ्यांकडून भरणा करून घेऊन नंतरच साहित्य वाटप करण्यात आले आहे.

(३) शिलाई मशिन प्राप्त झाल्याबाबतची लाभार्थ्यांची पोहोच नस्ती सोबत ठेवणेत आलेली आहे.

(४) शिलाई मशिनचा पुरवठा आदेशानुसार गटस्तरावर करण्यात आलेला होता. तथापि विभागीय कार्यालयात एकत्रित नोंद साठा नोंदवहीत माहितीसाठी ठेवणेत आलेली होती.

(५) मशिन तांत्रिकदृष्ट्या योग्य असलेबाबत जिल्हास्तरावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण सिंधुदुर्गनगरी यांचेकडून तपासणी करून घेणेत आलेली असून तपासणी अहवाल नस्तीसोबत जोडण्यात आलेला आहे.

(६) सदरच्या योजनेचे प्रस्ताव तालुक्याकडून विहित मुदतीत प्राप्त होत नाहीत व सदर प्रस्तावांना समितीची मंजुरी असल्याने योजना अंमलबजावणीस विलंब झालेला आहे. तथापि भविष्यात याबाबतची दक्षता घेण्यात येत आहे.



(७) तालुकास्तरावर पुरवठा करण्याचे आदेश असल्याने साहित्य पुरवठा तालुकास्तरावर करण्यात येतो व तालुकास्तरावरून साहित्य वाटपाबाबतचे नियोजन करून साहित्य वाटप केले जाते. यापुढे वित्तीय वर्षात साहित्याचे वाटप करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

(८) सदर योजनेचा उद्देश हा मागासवर्गीय महिलांना अर्थसहाय्य देणे असा असा नसून मागासवर्गीय महिलांचा स्वयंरोजगारातून आर्थिक स्तर उंचावणे असा असलेने त्यांना अर्थसहाय्य न करता स्वयंरोजगारासाठी शिलाई मशिन खरेदी करून पुरविलेल्या आहेत.

(९) लाभार्थ्याने दारिद्र्यरेषेखालील असलेबाबतचा दाखला प्रस्तावासोबत जोडलेला असल्याने त्याची स्वतंत्र नोंद मुळ प्रस्तावात करण्याची आवश्यकता नाही.

**मुख्य कार्यकारी अधिकारी याची साक्ष :**

समितीला उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे दिनांक १७ जुलै २०१४ रोजी समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची साक्ष घेतली.

मागासवर्गीय महिला लाभार्थ्यांना शिलाई मशिन पुरविल्यानंतर शिलाई मशिनच्या पोच पावत्या लेखापरीक्षणासाठी उपलब्ध नव्हत्या. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सिंधुदुर्ग जिल्हा परिषद यांनी याबाबत खुलासा करताना, समाज कल्याण विभागासाठी राखीव असलेल्या १० टक्के निधीतून ३३० लाभार्थ्यांना शिलाई मशिन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत असे स्पष्ट केले. त्यावर समितीने चुकीच्या ठिकाणी शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले आहे काय आणि लेखा परिक्षणादरम्यान पोचपावत्या का दाखविण्यात आल्या नाहीत. जिल्हा परिषदेचे लेखापरीक्षण होणार आहे यांची सूचना एक महिना अगोदर देण्यात येते, त्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या सर्व पोच पावत्या येथे आणून दाखविणे शक्य होते. पुढील काळात या संदर्भातील दक्षता घेण्यात यावी, सर्व बाबींचा आढावा खाते प्रमुखांनी वेळच्या वेळी घेतला पाहिजे असे म्हटले असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सिंधुदुर्ग जिल्हा परिषद यांनी तालुका व ग्रामीणस्तरावर वेळोवेळी तपासण्या करण्यात येतात असे समितीस सांगितले.

आता तयार कपड्यांची फॅशन आलेली आहे, त्यामुळे शिलाई मशिनचा वापर होत नाही असा ग्रामीण भागातील अनुभव आहे, त्यामुळे शिलाई मशिन देण्याबाबत शासनाने पुनर्विचार करण्याची गरज आहे. आधुनिक पद्धतीने इलेक्ट्रानिक एम्ब्रायडरी किंवा अन्य बाबींचा समावेश करून ग्रामीण भागातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण व्हावे यादृष्टीने या योजनांमध्ये बदल करण्याची गरज आहे असे समितीने साक्षी अंती मत व्यक्त केले.

**समितीने भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने खालील मुद्यांबाबत अधिक माहिती मागिवली.**

(क) सध्या प्रचलित असलेली योजना जसे " शिलाई मशिन पुरविणे " कालबाह्य ठरत असल्याने ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी नवीन योजना उदा. इलेक्ट्रॉनिक एम्ब्रॉयडरी मशिन पुरविणे, इ. योजना राबविण्यासाठी शासनाचे काय धोरण आहे, तसेच (ख) महिला व बालकल्याण आणि सामाजिक न्याय विभागामार्फत एकसारख्या योजना वेगवेगळ्या पद्धतीने राबविण्यात येत असल्यामुळे योजनांची पुनरावृत्ती होते. अत: अशा योजना एकाच विभागामार्फत राबविणे शक्य नाही काय, याबाबत शासनाचे धोरण काय आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील लेखी माहिती प्राप्त झाली :—**

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय, दि.२४ जानेवारी २०१४ मधील गट-ब वस्तू खरेदीच्या योजनामधील योजना क्रमांक १(६) महिलांना विविध साहित्य पुरविणे ही योजना अंतर्भूत असून शिलाई मशिन सोबतच पिकोफॉल मशिन पुरविणेबाबत समावेश करण्यात आला आहे. इलेक्ट्रॉनिक एम्ब्रॉयडरी मशिन पुरविणे, इत्यादी राबविण्यासाठी शासनाचे काय धोरण आहे, असा मुद्दा मा. समितीने उपस्थित केला असल्याने, आता दि. २४ जानेवारी २०१४ च्या शासन निर्णयान्वये सदर बाबींची पूर्तता झाली असून सदर योजना याप्रमाणे राबविण्याचे शासनाचे धोरण आहे.

समाज कल्याण विभागामार्फत लाभ देण्यात येणाऱ्या योजनांचे लाभार्थी मागासवर्गीय संवर्गातील असतात. तर महिला व बालविकास विभागामार्फत लाभ देण्यात येणारे लाभार्थी हे सर्वसाधारण, दारिद्र्यरेषेखालील महिला असतात. त्यामुळे अशा योजना त्या-त्या विभागाच्या अटी व शर्तींनुसार राबवाव्या लागणार आहेत.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात खालील विभागांकडून समितीला लेखी माहिती प्राप्त झाली :—**

**महिला व बालविकास विभाग :—**(१) ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय, दि. २४ जानेवारी २०१४ मधील गट ब वस्तू खरेदीच्या योजना मधील योजना क्रमांक १६, महिलांना विविध साहित्य पुरविणे ही योजना अंतर्भूत असून शिलाई मशिन सोबतच पिकोफॉल मशिन पुरविणेबाबत समावेश करण्यात आला आहे. इलेक्ट्रॉनिक एम्ब्रॉयडरी मशिन पुरविणे इ. राबविण्यासाठी शासनाचे काय धोरण आहे असा मुद्दा मा.समितीने उपस्थित केला असल्याने आता दि. २४ जानेवारी २०१४ च्या निर्णयान्वये सदर बाबींची पुर्तता झाली असून सदर योजना याप्रमाणे राबविण्याचे शासनाचे धोरण आहे. (२) समाजकल्याण विभागामार्फत लाभ देण्यात येणारे योजनांचे लाभार्थी मागासवर्गीय



घटकातील असतात. तर महिला व बालविकास विभागामार्फत लाभ देण्यात येणारे लाभार्थी हे सर्वसाधारण, दारिद्र्यरेषेखालील महिला असतात. त्यामुळे अशा योजना त्या-त्या विभागाच्या अटी व शर्तींनुसार राबवाव्या लागणार आहेत.

**सामाजिक न्याय विभाग—**सामाजिक न्याय विभागामार्फत अशा प्रकारच्या कोणत्याही योजना राबविण्यात येत नाही. महिला व बालविकास विभागामार्फत सर्व प्रवर्गांतील महिलांसाठी विविध प्रकारच्या योजना राबविण्यात येतात. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील महिलांकरिता महिला व बालविकास विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांकरिता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून त्या विभागास नियतव्यय उपलब्ध करून देण्यात येतो. सबब, महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना या महिला व बालविकास विभागामार्फतच राबविणे आवश्यक आहे.

**आदिवासी विकास विभाग—**आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी महिलांना शिलाई मशिन पुरविण्यासाठी अर्थसहाय्य देण्याबाबतची अशी कोणतीही स्वतंत्र योजना राबविण्यात येत नाही. तथापि या विभागामार्फत केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना राबविली जाते. सदर योजनेचे वैशिष्ट्य खालीलप्रमाणे आहे :—

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रातील स्थानिक गरजा ह्या शासनाने मान्य केलेल्या नियमित योजनांहून भिन्न असतात आणि त्यामुळे त्यांना नियमित आदिवासी उपयोजनेत निधी उपलब्ध करण्यासाठी न्युक्लिअस बजेट नावाची योजना १९८१-८२ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना योजना तयार करण्याचे तसेच त्यांची अंमलबजावणी किंवा इतर विभागाच्या स्थानिकदृष्ट्या महत्त्वाच्या योजना विहित कार्यपद्धती अवलंबून त्या-त्या विभागाकडून राबवून घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. या योजनांतर्गत आदिवासी व्यक्तीस/कुटुंबास रु.५०,००० मर्यादेत आर्थिक सहाय्य देण्यात येते. प्रकल्पातील स्थानिक गरजा विचारात घेऊन प्रकल्प स्तरावर या योजनेचा लाभ दिला जातो. यामध्ये काही प्रकल्पांमध्ये शिलाई मशिनसुद्धा वाटप केल्या जातात. आदिवासी वस्त्या दुर्गम भागात असल्यामुळे बऱ्याच ठिकाणी वीज पुरवठा उपलब्ध नाही. त्यामुळे या अडचणीचा विचार करून कार्यक्रम राबविणे उचित आहे. याबाबत कोणत्याही एका विभागाने मॉडेल तयार करून मशिन पुरविण्याकरिता समूह तयार करून योजना तयार केल्यास अनुसूचित जमातीच्या लाभार्थी महिलांकरिता सदरची योजना आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील शबरी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांच्यामार्फत राबविता येईल.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

मागासवर्गीय महिलांना शिलाई मशिन पुरविण्यासाठी अर्थसहाय्य ही योजना जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या स्वनिधीतून राबविण्यात येते. त्याबाबतचा मार्गदर्शक शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. अगोदर या योजनेंतर्गत शिलाई मशिनचे वाटप करण्यात येत होते. त्यासोबत आता एम्ब्रॉयडरी व पिकोफॉल मशिन पुरविणे या बाबींचा समावेश करण्यात आला आहे. तसेच महिला व बालकल्याण विभागामार्फत गुणवत्ता विकास अंतर्गत ज्या महिलांचे शिक्षण ८ वी पर्यंत झालेले आहे, त्यांच्याकरिता काही नवीन योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे असा विभागीय सचिवांनी समितीस खुलासा केला.

समितीने शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनेतील काही बाबींचा पुरवठा करण्यासाठी प्रत्येक वेळी कंपनी व शासन यांच्यामध्ये दर करार करण्यात येतो. दर करार करण्यात आलेल्या कंपन्यांकडूनच वस्तू खरेदी करण्याबाबतचे निदेश शासनस्तरावरून देण्यात येतात. दर करारापेक्षा कमी किमतीमध्ये व चांगल्या दर्जाच्या शिलाई मशिन बाजारात उपलब्ध आहेत. शासनाने दर करार केलेल्या कंपन्यांकडून पुरविण्यात येणाऱ्या मालाबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी आहेत. जर जिल्हा परिषदेला बाजारातून माल खरेदी करावयाचा झाल्यास, जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी त्यास परवानगी देत नाहीत. कारण दर करार कंत्राटदारा व्यतिरिक्त इतरांकडून माल खरेदी न करण्याचे शासनाचे आदेश आहेत. बाजारामध्ये दर करार करण्यात आलेल्या कंपनीच्या मालापेक्षा व दरापेक्षा चांगल्या दर्जाचे व कमी किमतीमध्ये माल उपलब्ध होऊ शकतो. परंतु शासनाने दर करार केलेले असल्यामुळे जिल्हा परिषदेला दर करारापेक्षा कमी किमतीतील व चांगल्या दर्जाचा माल खरेदी करता येत नाही. दर करार कंत्राटदाराकडून खरेदी केलेला माल निकृष्ट दर्जाचा असेल तर जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांची चांगल्या दर्जाचा माल नसल्याने बदनामी होते. दर करार पुरवठादारापेक्षा जिल्हा परिषदेला कमी दराने व चांगल्या दर्जाचा माल मिळत असेल तर दर कराराऐवजी बाजारातून खरेदी करण्याची परवानगी देणेबाबतचे मत प्रतिपादन केले ही बाब विभागीय सचिवांनी मान्य केली.

**अभिप्राय व शिफारशी :**

समितीला लेखी स्वरूपात प्राप्त झालेली माहिती भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेली माहिती विचारात घेता, जिल्हा परिषदेने महिलांना शिलाई मशिन पुरवितांना त्यांना पुराणकाळातील जुन्या मशिन न देता एम्ब्रॉयडरी व पिकोफॉल अशा आधुनिक मशिन पुरविण्याबाबतचा महिला व बालकल्याण विभागाने दि. २४ जानेवारी २०१४ रोजीच्या शासन निर्णय निर्गमित केल्याची बाब समिती समोर आली. तसेच



जिल्हा परिषदांमार्फत कल्याणकारी योजनांकरिता लाभार्थ्यांसाठी जी खरेदी केली जाते ती दरकरारानुसार करण्यात येते. अशा खरेदीमध्ये बऱ्याच वेळा दरकरारानुसार खरेदी केलेल्या जादा मुल्याच्या पण निकृष्ठ दर्जाच्या वस्तुपेक्षा कमी दरामध्ये चांगल्या दर्जाच्या वस्तू बाजारामध्ये उपलब्ध असूनही शासनाच्या दरकराराबाबत असलेल्या निर्णयांच्या बंधनामुळे बाजारातून खरेदी करता येत नाहीत. बहुतेक वेळा दरकरारानुसार खरेदी केलेल्या वस्तू कंत्राटदारांकडून खरेदी केल्या जातात. त्यांचा चांगला दर्जा राहतोच असे नाही. तसेच बाजारात चांगल्या दर्जाच्या व स्पर्धा होईल या उद्देशाने सहज असा माल उपलब्ध होऊ शकतो.

**सबब, सध्याच्या प्रचलित दरकरारात बदल करून स्पर्धात्मक पद्धतीने निविदेद्वारे खरेदी करण्याबाबत विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच महिला व बालकल्याण विभागाचा दिनांक २४ जानेवारी २०१४ रोजीचा शासन निर्णय हा एम्ब्रॉयडरी तसेच पिकोफॉल मशिन पुरविण्याबाबतचा जरी असला तरी त्यानुसार पुरवठा होत नाही असे दिसून येत आहे. सबब, उक्त शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करून त्यानुसार खरेदीची कार्यवाही करण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना कळविण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यांत समितीला देण्यात यावी.**

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेअंतर्गत समाजकल्याण विभागांतर्गत राखीव असलेल्या १०% निधीमधून ३३० लाभार्थ्यांना शिलाई मशिन्स उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. तथापि, त्या लाभार्थ्यांना वितरीत केल्याच्या पोचपावत्या लेखा परिक्षणाच्या वेळी उपलब्ध नव्हत्या. **लेखा परिक्षणाची पूर्वसूचना १ महिना आधी जिल्हा परिषदेत देण्यात येत असते. तथापि, त्यानंतरही त्या तपासणीसाठी उपलब्ध नसणे ही संशयास्पद बाब आहे असे समितीचे ठाम मत आहे. तेव्हा लेखा परिक्षणाच्या वेळी लाभार्थ्यांना दिलेल्या शिलाई मशिनच्या पोचपावत्या न दाखवणाऱ्या तत्कालीन अधिकारी / कर्मचाऱ्यांना तसेच हा अभिलेख वेळीच नस्तीत उपलब्ध न करून देणाऱ्या संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा नियमाअंतर्गत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.२ विमा व रॉयल्टीची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल न केल्याबाबत व बांधकामाच्या इतर अनियमिततेबाबत (परिच्छेद क्रमांक ३.१४(७) जिल्हा परिषद सिंधुदुर्ग सन २००९-१० (परिच्छेद क्रमांक ४०) -**

बांधकाम उप विभाग, पंचायत समिती, वैभववाडी ने सन २००९-१० मध्ये अ गट रस्ते दुरुस्ती अनुदानातून एकूण १४ कामांवर रक्कम रुपये ३,००,३३९ व १२ वा वित्त आयोगातून केलेल्या एकूण १८ कामावर रक्कम रुपये ८,७९,४०३ असा एकूण रक्कम रुपये ११,७९,४७२ इतका खर्च केलेला आहे. याबाबत लेखापरीक्षकांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत :—

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय क्र. जिपर /२०००/प्र. क्र. ८३७/३५, दिनांक ८ मे २००२ अन्वये कंत्राट कामाचा विमा, शासकीय विमा संचालनालयाकडे उतरविणे आवश्यक असतांना ठेकेदारांचे देयकातून विमा रक्कम कपात करण्यात आलेली नाही. तरी रस्ते अ-गट एकूण १४ कामांवरील विमा रक्कम रुपये ३,१५० व १२ वा वित्त आयोग अनुदानातून केलेल्या १८ कामांची विम्याची रक्कम रुपये ९,२४३ अशी एकूण रुपये १२,३९३ वसूल करून विमा संचालनालयाकडे भरणा करणे आवश्यक आहे.

(२) सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय, संकीर्ण/०२/०५/२९१/इमारती/ दिनांक ११ ऑगस्ट २००३ तसेच महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, शासन निर्णय, गौण खनिज/१०८८/४३३/३५९२/२-ब, दिनांक १८ ऑक्टोबर २००१ निर्णयानुसार मक्तेदाराने रॉयल्टी भरणे आवश्यक असताना भरलेली नाही. तरी, रस्ते गट-अ मधून केलेल्या कामावर वापरलेल्या साहित्याची रॉयल्टी रक्कम रुपये २,२७५ व १२ वा वित्त आयोगामधून केलेल्या कामाची रॉयल्टी रक्कम रुपये १,८१२ अशी एकूण रुपये ४,०८७ रॉयल्टी ठेकेदाराकडून वसूल करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

(३) अ-गट रस्ते दुरुस्ती अनुदानातून रस्ते दुरुस्ती, खड्डे भरणे अशी १४ कामे केलेली आहेत. कामाच्या मोजमाप नोंदवह्या तपासता एकूण रस्त्याच्या लांबीपैकी कोणत्या कामातील चॅनेल खड्डे बुजविले याबाबत पुस्तकामध्ये चॅनेल नोंदविलेले नाहीत. मोघमपणे खड्ड्याची मापे नोंदवून मुल्यांकन केलेले आहे.

(४) महाराष्ट्र शासन पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, निर्णय, ग्रापापू. १०९८/प्र.क्र.४२५/ पापु, दिनांक ११ जानेवारी १९९९, परिच्छेद क्रमांक ४० नुसार कामावर वापरलेली वाळू, खडी, सिमेंट, स्टील, इत्यादी साहित्याची तपासणी शासकीय प्रयोगशाळा किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून तपासून घेऊन गुणवत्ता चाचणी अहवाल घेतलेला नाही.



(५) मांगवली जोडरस्ता खडीने भरणे, कि.मी. ०० ते ३/०० कामाची पत्रिका तपासता ठेकेदार सरपंच, ग्रामपंचायत मांगवली आणि करारपत्र, निविदा फॉर्म व देयकावर सह्या केलेल्या नसल्याचे आढळले. तरी कागदपत्र पूर्ण केलेली नसताना ठेकेदाराला रक्कम अदा केलेली आहे.

(६) रस्ते दुरुस्ती अ-गट मधील काम करुळ भट्टीवाडी रस्ता खड्डे भरणे कामाची पत्रिका तपासता ठेकेदाराच्या करारपत्रावर व निविदापत्रावर सह्या नाहीत. निविदा फॉर्मवर सही नसताना सदर निविदा मंजूर केलेली आहे. तसेच करारपत्रावर ठेकेदाराने सही केलेली नसताना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे.

(७) १२ वा वित्त आयोग अनुदानातून करण्यात आलेल्या रस्त्याची वापरलेली जमीन बक्षीस पत्राने संबंधित जमीन मालकाकडून जिल्हा परिषद, सिंधुदुर्गच्या नावे हस्तांतरित करून घेतलेली नाही व रस्त्याची नोंद संबंधित ग्रामपंचायतीच्या नमुना नंबर २६ मध्ये केल्याबाबतची सत्यप्रत पंजिकेसोबत नाही.

(८) १२ वा वित्त आयोगमधील काम सडुरे बौद्धवाडी-चव्हाणवाडी रस्ता कॉंक्रिटीकरण करणे, अंदाजपत्रकात बाब ३ नुसार कामावर फलक लावण्याची तरतूद केलेली असता ठेकेदार, सरपंच, ग्रामपंचायत सडुरे- शिरोळे यांनी कामाच्या जागी फलक लावलेला नाही. शासन निर्णय, पीव्हीएस/१०९९/प्र.क्र.९९/०८, दिनांक १५ ऑक्टोबर १९९७ अन्वये फलक लावणे आवश्यक असताना फलक लावण्यात आला नाही.

वरील आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी स्वरूपात माहिती प्राप्त झाली :-

(१) सदर मुद्यातील रस्ते अ-गट एकूण १४ कामांवरील विमा रक्कम रुपये ३,१५० व १२ वा वित्त आयोग अनुदानातून केलेल्या १८ कामांची विम्याची रक्कम रुपये ९,२४३ मिळून एकूण रक्कम रुपये १२,३९३ संबंधित ठेकेदाराच्या सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करून विमा संचालनालयाकडे भरणा करण्यात आलेली आहे.

(अ) पत्र क्र.पंसचै/अर्थ/रोखपाल/४९४५/२०१३, दि. ६ मार्च २०१३ ने डी.डी. नं. २१०५८६/२५-०२-२०१३ रक्कम रु. २,६००

(ब) पत्र क्र. पंसवै/अर्थ/रोखपाल/४९४६/२०१३, दि. ६ मार्च २०१३ ने डी.डी. नं. १४६८३२/२५ फेब्रुवारी २०१३ रक्कम रु. ७,७४३

(क) पत्र क्र. सिंजिप/बांधकाम/उपअभि/जिपक/आस्था-३/अग.वि.मा./११३/२०१३, दि. ०८ मे २०१३ ने डी.डी. नं. ८९१८२६/२८-०३-२०१३ र रु.२४९१ सोबत सदर पत्राची प्रत जोडण्यात आलेली आहे.

(२) सोबतच्या परिशिष्टामध्ये नमुद केले प्रमाणे रस्ते अ-गट मधून केलेल्या कामावर वापरलेल्या साहित्याची रॉयल्टी रक्कम रुपये २,२७५ व १२ वा वित्त आयोगमधून केलेल्या कामांची रॉयल्टी रक्कम रुपये १,८१२ अशी एकूण रॉयल्टीची रक्कम रुपये ४,०८७ संबंधित ठेकेदारांच्या सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात आलेली असून, मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग (खनिज विभाग) व तहसीलदार, वैभववाडी यांचेकडे,—

(१) पत्र क्र. पंसवै/अर्थ/रोखपाल/४९३५/२०१३, दि. ६ मार्च २०१३ ने डी.डी.पं. २१०५८७/-२५-०२-२०१३ र रु. २,२७५

(२) पत्र क्र. पंसवै/अर्थ/रोखपाल/४९३४/२०१३, दि. ५ मार्च २०१३ ने डी.डी. पं. १४६८३३/२५-०२-२०१३ र रु.१२१३/-

(३) पत्र क्र. सिंजिप/बांधकाम/अपअभि/जिपक/आस्था-३/गौण/. /११४/२०१३, दि. ६ मे २०१३ ने डी.डी. नं. ८५०६१०/८-०३-२०१३ र रु. ५९९ ने सादर करण्यात आलेले आहेत त्याची प्रत यालगत जोडण्यात आलेली आहे.

(३) अ-गट रस्ते दुरुस्ती अनुदानातून १४ कामे रस्ते दुरुस्ती, खड्डे भरण्याची केलेली आहेत. कामांची अंदाजपत्रके करतेवेळी रस्त्यांच्या लांबीचे चॅनेज नोंदून करण्यात आलेली होती त्यानुसार मोजमाप पुस्तकात कामाच्या लांबीचे चॅनेज नोंद करून त्यानुसार कामाच्या मोजमाप पुस्तकांमध्ये चॅनेज नोंद करण्यात आलेली आहे. त्याची सत्यप्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.

(४) सदरची कामे ही अ-१ फुटकळ स्वरूपाची असल्याने कामावरील साहित्याची चाचणी घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) मांगवली जोडरस्ता खडीने खड्डे भरणे, कि.मी. ०/० ते ३/०० कामाची पंजिका तपासता ठेकेदार सरपंच, ग्रामपंचायत मांगवली यांनी करारपत्र, निविदा फॉर्म व देयकावर सह्या अनावधानाने



करून घेण्याच्या राहिल्या. त्या आता सह्या करून घेण्यात आलेल्या आहेत. त्याची सत्य प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.

(६) रस्ते दुरुस्ती, अ-गट मधील काम करुळ भट्टीवाडी रस्ता खड्डे भरणे कामाची पंजिकेत ठेकेदार श्री. ए.एस.पाटील यांच्या करारपत्र व निविदा पत्रावर सह्या अनावधनाने करून घेण्याच्या राहून गेल्या होत्या. त्या आता सह्या घेण्यात आलेल्या आहेत. त्याची सत्यप्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.

(७) १२ वा वित्त आयोग अनुदानातून करण्यात आलेल्या सदर कामाच्या रस्त्यांची नोंद ग्रामपंचायतीच्या नमुना नं. २६ मध्ये नमूद असल्याने नमुना नं.२६ ची सत्यप्रत पंजिकेसोबत ठेवण्यात आलेली आहे. त्याची सत्यप्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.

(८) १२ वा वित्त आयोगामधील काम सडुरे बौद्धवाडी, चव्हाण-वाडी रस्ता काँक्रीटीकरण करणे, ठेकेदार सरपंच, ग्रामपंचायत सडुरे-शिराळे यांनी कामाच्या जागी सदर नामफलकाची नोंद प्रत्यक्ष फलक लावलेची खात्री करून त्या प्रपत्राची सत्यप्रत पंजिकेसोबत ठेवण्यात आलेली आहे. त्याची सत्यप्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

समितीने दिनांक १७ जुलै, २०१४ रोजी सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेस भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. भेटीच्या वेळी समितीने विमा व रॉयल्टी वसूलीची रक्कम त्याचवेळी देयकातून वसूल का करण्यात आली नाही, सदर रक्कम उशिराने वसूल करण्यास कोण जबाबदार आहे, मोजमाप पुस्तकात खड्डे भरल्याची चॅनेज नोंद केव्हा घेण्यात आली आहे, ती लेखापरीक्षणाचे वेळी का दाखविण्यात आली नाही, अशी विचारणा केली. त्यावर क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी विम्याची रक्कम उशिरा भरली असल्याचे समितीसमोर स्पष्ट केले. तद्‌नंतर समितीने कामगारांकडून विम्यासाठी १ टक्के रक्कम कापून घेतली जाते. तसेच, रस्त्याचा विमा काढला जातो. देयक अंतिम करताना कंत्राटदाराकडून २ टक्के रक्कम कापून घेतली जाते. अशा प्रकारे विमा कंपन्यांना कामगार व कंत्राटदार दोघांकडूनही विम्याची रक्कम मिळत असते, त्यामुळे अतिवृष्टी झाली व त्यामध्ये रस्ता वाहून गेला तर रस्ता दुरुस्तीसाठी विमा कंपनीकडून नुकसानभरपाई मिळाली पाहिजे. तसेच, कामगाराचा अपघात झाला तर त्या कामगारालाही विमा कंपनीकडून नुकसानभरपाई मिळाली पाहिजे. परंतु प्रत्यक्षात आजपर्यंत एकाही प्रकरणात विमा कंपनीकडून नुकसानभरपाई मिळालेली नाही. मागील अनेक वर्षांपासूनची विम्याची रक्कम विमा कंपन्यांकडे जमा झालेली आहे, परंतु

त्याचा फायदा कामगारांना किंवा नुकसान झालेल्या शासकीय मालमत्तांसाठी मिळत नाही. ही बाब अधोरेखीत केली. पुढे शासकीय कामे करीत असताना विम्यापोटी मोठ्या प्रमाणावर रक्कम संबंधित विमा कंपनीला अदा केली जाते. तथापि, त्याचा पाहिजे तेवढा फायदा शासनाला किंवा कामगारांना मिळत नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यात मागील ५ वर्षांत अशा प्रकारचे किती दावे सादर करण्यात आले व विमा कंपनीकडून किती दाव्यांची पूर्तता झालेली आहे व त्याची एकूण रक्कम किती आहे. या समितीच्या प्रश्नाचा खुलासा होऊ शकला नाही. राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमध्ये कामगारांकडून कामगार विम्याची १ टक्के रक्कम कापून घेतली जाते. राज्यातील सर्व जिल्हा परिषदांकडून त्यांनी विमा कंपनीला गेल्या ५ वर्षात अदा केलेली हप्त्याची रक्कम, दाखल करण्यात आलेले दावे, सोडविण्यात आलेले दावे व नुकसानभरपाईपोटी मिळालेली एकूण रक्कम याबाबतची माहिती समितीस प्राप्त होऊ शकली नाही.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे खालील मुद्यांबाबत जिल्हा परिषदेकडून अधिक माहिती मागविली :—**

(क) कंत्राटदाराकडून कामापोटी कापून घेण्यात आलेली विम्याची रक्कम शासनाकडे जमा करण्यात आली आहे काय, नसल्यास का नाही,

(ख) अशा प्रकारे राज्यात मार्च, २०१४ अखेरपर्यंत किती रक्कम विमा कंपनीकडे जमा करण्यात आली आहे,

(ग) अतिवृष्टी किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे रस्ता वाहून गेला तर किंवा नादुरुस्त झाला तर तसेच कामगाराचा अपघात झाला तर विमा कंपनीकडून भरपाई मिळणे आवश्यक आहे काय,

(घ) अतिवृष्टीमुळे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे रस्ता वाहून गेला किंवा कामगारास अपघात झाला असता अशा प्रकरणी विमा कंपनीने किती प्रकरणात नुकसानभरपाई दिली आहे, नुकसान-भरपाई दिलेली नसल्यास त्याची कारणे काय आहेत.

**उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने खालील प्रमाणे अधिक माहिती सादर केली :—**

(क) कंत्राटदाराकडून कामापोटी कापून घेण्यात आलेली विम्याची रक्कम शासनाकडे जमा करण्यात आलेली आहे.



| (ख) | मुद्यातील बाब | बांधकाम विभाग | ग्रा.पा.पु.विभाग | ल.पा.विभाग | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | विमा रक्कम | १,२३,५५,१२८ | ११,४५,२३५ | २६,८०,८४१ | १,६१,८१,२०४ |
| | रॉयल्टी रक्कम | २,३६,९२,२३० | ६,१९,७६६ | २९,१६,४१६ | २,७२,२८,४१२ |
| | एकूण | ३,६०,४७,३५८ | १७,६५,००१ | ५५,९७,२५७ | ४,३४,०९,६१६ |

अशाप्रकारे जिल्हा परिषदकडून मार्च, २०१४ अखेर (दिनांक ०१/०४/२००८ ते ३१/०३/२०१(४) रक्कम रुपये १,६१,८१,२०४ विमा कंपनीकडे जमा करण्यात आलेली आहे.

(ग) होय.

| (घ) | मुद्यातील बाब | बांधकाम विभाग | ग्रा.पा.पु.विभाग | ल.पा.विभाग | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल करण्यात आलेले दावे | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| | सेटल झालेले दावे | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| | नुकसान भरपाईपोटी मिळालेली एकूण रक्कम | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| | करण्यात आलेली कारवाई | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

या जिल्हा परिषदेअंतर्गत अशी बाब झालेली नसल्याने विमा कंपनीकडे नुकसान भरपाई मागणी करण्यात आलेली नाही.

**उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने शासनाकडून खालीलप्रमाणे अधिक माहिती प्राप्त झाली.**

**सार्वजनिक बांधकाम विभाग -**

(क) उप विमा संचालक, शासकीय विमा निधी, मुंबई, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.प्र.वि.नि.-२३१०/सा.बा.वि./विमा-वसूली/अभि-३, दि.०८/०९/२०१० नुसार 'ब-१' नमुन्यातील निविदा कंत्राटात देयकाच्या १% रक्कम कामगार विम्यापोटी कापून घेण्यात येते. कंत्राटदाराने कामगाराचा विमा उतरवल्याचा पुरावा म्हणून शासकीय विमा निधीने निर्गमित केलेल विमा पत्र सादर केले तर त्या कामांची विमा रक्कम परत करण्यात येते. अन्यथा सदर रक्कम शासकीय विमा निधीकडे जमा करण्यात येते.

(ख) अशा प्रकारे जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, सिंधुदुर्ग यांनी दिनांक ०१/०४/२००९ ते ३१/०३/२०१४ पर्यंत रु. १,२३,५५,१२८ इतकी रक्कम शासकीय विमा निधी अंतर्गत जमा केलेली आहे.

(ग) प्रत्यक्ष काम चालू असतांना त्या कामावरील कामगाराचा अपघात झाल्यास त्या कामगारास विमा संरक्षण देय आहे.

(घ) विमा उतरवलेल्या कामावर कामगारास अपघात घडल्याचे प्रकरण निदर्शनास आलेले नाही तसेच कोणत्याही कामगाराने विमा संरक्षणाखाली नुकसान भरपाई मागितल्याचे निदर्शनास आले नाही.

**संचालक, विमा संचालनालय -**

(क) कंत्राटदाराकडून कामापोटी कापून घेण्यात आलेली विमा हप्त्याची रक्कम वेळोवेळी लेखाशिर्ष ८१२१५०३९ जमा करण्यात आलेली आहे.

(ख) राज्यात मार्च, २०१४ अखेरपर्यंत विवरणपत्र-ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे विमा हप्ता रक्कम जमा करण्यात आलेली आहे.

**विवरणपत्र - ब**

**विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**कंत्राटदारांनी या कार्यालयाकडून विमा पत्रक न काढल्यामुळे प्रकर्ता सार्वजनिक बांधकाम विभाग व प्रधान मंत्री ग्राम सडक योजना ( महाराष्ट्र राज्यातील) यांनी त्यांच्या चालू देयकामधून कपात करून या कार्यालयास भरणा केलेल्या विमा हप्ता रकमेचा वर्षनिहाय तपशिल**

**सन २००९ ते २०१४**

| अ.क्र. | वर्ष | कामांचा प्रकार | विमा हप्ता रक्कम | निकाली काढलेले दावे | नुकसान भरपाई रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००९-१० | कंत्राटी कामे | १४,८४,०३,२२८/- | नाही | नाही |
| २ | २०१०-११ | कंत्राटी कामे | १८,४९,३९,५३६/- | नाही | नाही |
| ३ | २०११-१२ | कंत्राटी कामे | २४,४६,३७,६८१/- | नाही | नाही |
| ४ | २०१२-१३ | कंत्राटी कामे | २८,४९,३२,८१३/- | नाही | नाही |
| ५ | २०१३-१४ | कंत्राटी कामे | ३०,७७,११,५७१/- | नाही | नाही |



(ग) कंत्राटदाराच्या कामाचा विमा तसेच तेथे काम करणाऱ्या कामगारांचा विमा हा कंत्राटी कामाच्या कालावधीशी निगडीत असतो. उपरोक्त कालावधीत विमा दावा उद्‌भवल्यास विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून नुकसानभरपाई विमा पत्रकाच्या अटी व शर्तीनुसार विमा अधिनियम १९३८ व विमा नियामक विकास प्राधिकरण (IRDA १९९(९) मधील अनुज्ञप्ती धारक स्वतंत्र सर्वेक्षकांच्या शिफारशीस अनुसरुन विमा दावा अनुज्ञेय ठरविला जातो व निकाली काढला जातो.

(घ) कंत्राटी कामाचा विमा तसेच तेथे काम करणाऱ्या कामगारांचा विमा हा कंत्राटी कामाच्या कालावधीशी निगडीत असतो. उपरोक्त कालावधीत विमा दावा उद्‌भवल्यास विमा संचालनालयाकडून विमा पत्रकाच्या अटी व शर्तीनुसार नुकसान भरपाई देण्यात येते. विमा पत्रकाखाली वादळ, तुफान, पूर व महापूर (STFI) हे संरक्षण वैकल्पिक असून यासाठी अतिरिक्त रक्कम आकारली जाते. विमा धारकाने ही रक्कम प्रदान केली असल्यास व कंत्राटी कामाच्या अधिग्राह कालावधीत दावा उद्‌भवल्यास सर्वेक्षकाच्या शिफारशीनुसार नुकसानभरपाई देय आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १६ जून, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. त्यावेळी विमा संचालनालयाच्या प्रतिनिधींनी पृच्छा केली की, बांधकाम विभागांतर्गत रस्त्यांचे काम करीत असताना अपघात झाले आहेत काय, झाले असतील तर संबंधित मजुरांना नुकसानभरपाईची रक्कम अदा केली आहे काय, रस्ते वाहून गेल्यानंतर त्याबाबतची नुकसान भरपाई विमा कंपनी का देत नाही, जर त्यासाठी विमा उतरविताना अट नसेल तर तिचा समावेश का करण्यात येत नाही, यावर विमा संचालनालयाच्या प्रतिनिधींनी सदरहू पर्याय विमा उतरविताना दिलेला असतो. ज्यावेळी कंत्राटदार सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विमा कंपनीला फॉर्म भरुन देतो त्यावेळी त्याने पर्याय निवडला व प्रिमिअम भरला असेल तर विमा कंपनी संरक्षण देते अशी समितीस माहिती समितीला दिली.

समितीने विभागीय सचिवांकडून अधिक माहीती घेतली असता त्यांनी असे सांगितले की, विमा संचालक (प्र.) श्री. वि.ज.सुरळकर यांनी समितीला सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत देण्यात येणाऱ्या कंत्राटी कामाचा विमा उतरवण्याबाबत सविस्तर माहिती दिली आहे. त्यानुसार कंत्राटदाराकडून विम्यापोटी रक्कम वसूल केल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभाग ती रक्कम विम्यासाठी खर्च करते किंवा कसे, सन २००९-२०१० मध्ये सार्वजनिक बांधकामाच्या कंत्राटी कामाकरिता काढण्यात आलेल्या विम्यापोटी २८,१३,१४० रुपये विमा कंपनीकडे जमा करण्यात आलेले आहेत. परंतु

त्यासंबंधीचे दावे निकाली काढलेले नाहीत व नुकसानभरपाई रक्कम दिलेली नाही, अशी माहिती विमा कंपनीच्या विवरणपत्रामध्ये दिलेली आहे. **विमा संचालनालयाने** दिनांक १० नोव्हेंबर, २०१४ रोजी **समितीस** पाठविलेल्या माहितीमध्ये असे नमूद आहे की, " शासकीय विमा निधी ही शासनाची स्वयं विमा योजना असून महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्यरत आहे. वित्त विभागाच्या दिनांक १६ जानेवारी, १९८४ च्या शासन निर्णयानुसार राज्य शासनाचे शासकीय विभाग, निमशासकीय विभाग, महामंडळे, मंडळे, सार्वजनिक उपक्रम, विद्यापीठे, प्राधिकरणे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, नगर परिषदा, शासनाच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष नियंत्रणाखालील सर्व प्रकारच्या संस्था इत्यादी यांनी प्रकर्ता या नात्याने कंत्राटी कामाचा विमा व ते काम पूर्ण करण्यास नियुक्त करण्यात येणाऱ्या कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे कंत्राटदारास बंधनकारक आहे. जे कंत्राटदार सदर कंत्राटी कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरवून विमापत्राची प्रत संबंधित प्रकर्ता यांना सादर करत नाहीत, अशा कंत्राटदाराच्या चालू देयकातून विमा हप्त्यापोटी रक्कम कपात करून शासकीय विमा निधीकडे जमा करण्यात येते व त्या रक्कमेतून प्रकर्ता तथा कंत्राटदारास विमापत्रकाखाली विमाछत्र उपलब्ध करून देण्यात येते. या संचालनालयास विमा हप्त्याच्या स्वरुपात प्राप्त होणारा महसूल हा राज्य शासनाचा विनाकर महसूल असून तो राज्य विकासासाठी शासन उपयोगात आणला जातो. आपण २ टक्के रक्कम या कार्यालयाकडे पाठविण्याबाबतचा उल्लेख विमा संचालनालयाच्या, पत्रात केलेला आहे. परंतु या कार्यालयाकडे फक्त १ टक्का रक्कम पाठविण्यात येते व १ टक्का रक्कम कामगार कल्याण निधी संदर्भात असून त्या १ टक्का रकमेचा या कार्यालयाशी काहीही संबंध नाही. " त्यावर विमा संचालनालयाच्या प्रतिनिधींनी समितीस उत्तर दिले की, सदरची माहिती कंत्राटदारांनी विमा संचालनालयाकडून विमा पत्रक न काढल्यामुळे प्रकर्ता सार्वजनिक बांधकाम विभाग व प्रधान मंत्री ग्राम सडक योजना (महाराष्ट्र राज्यातील) यांनी त्यांच्या चालू देयकामधून कामगार विम्यापोटी कापून घेतलेल्या १ टक्का रकमेसंबंधीची आहे. ज्यावेळी कंत्राटदाराला वर्क ऑर्डर मिळते त्यावेळी कंत्राटदाराने विमा काढावयास पाहिजे व तो काढला तर त्यानुसार विमाछत्र उपलब्ध करून देण्यात येते. काही प्रकरणी मुदतीमध्ये विमा न काढल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने विम्यापोटी ठराविक रक्कम कंत्राटदाराच्या देयकातून कपात केलेली आहे त्यावर विभागीय सचिवांनी उत्तर दिले की, त्यावेळी प्रत्यक्षात काय विषय झाला याची त्यांना माहिती नाही. परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाने विमा योजनेसंबंधीचे ज्ञान सर्व स्तरावर परिपूर्ण असावे, याकरिता परिपत्रक निर्गमित केले आहे. कंत्राटदार हे कंत्राटाचा विमा काढतात व लहान कामाबाबतच्या विम्यापोटी त्यांच्या देयकातून रक्कम कापली जाते व संबंधिताना विमाछत्र उपलब्ध करून दिले जाते.



या सर्व बाबींवर शासनाचे मत जाणून घेण्याबाबत समितीने पृच्छा केली असता, राज्य शासनाची ही स्वयं विमा योजना आहे. ही आस्थापना अस्तित्वात नसतील तर आज सर्व विनाकर महसूल केंद्र शासनाच्या नियंत्रणाखालील असलेल्या सार्वजनिक विमा कंपन्याकडे किंवा खाजगी विमा कंपन्याकडे वर्ग झाला असता. कंत्राटदार हे कामाच्या पूर्ण कालावधीकरिता विमाछत्र काढत नाही किंवा त्याचे नुतनीकरण करीत नाहीत, विमाछत्रासंबंधी दावा निकाली काढण्यासाठी कागदपत्रे सादर करीत नाहीत, त्यामुळे दावे निकाली निघत नाहीत. ज्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांचेकडून एखाद्या कामाच्या कंत्राटाचे पैसे कंत्राटदाराच्या देयकातून वजा करण्यात येतात, त्यावेळी त्याची माहिती विमा संचालनालयास देण्यात आली तर काम सुरू झाल्यापासून विमाछत्र उपलब्ध करून देणे संचालनालयास शक्य होते. तसेच काम सुरू असताना अपघात झाल्यास सदर रक्कम शासन उपयोगात आणू शकते अशी माहिती विमा संचालनालयाच्या प्रतिनिधींनी समितीला दिली.

तद्नंतर समितीने पुढे असे मत प्रदर्शित केले की, वस्तुतः या सर्व बाबी करणे शक्य होत नाही. कंत्राट मिळाल्यानंतर कंत्राटदार विमाछत्राचे पैसे स्वतः भरत नाही. काम सुरू झाल्यानंतर १ टक्का काम जास्तीचे भरणार हे त्याला माहीत असते. तसेच, काम सुरू झाल्यानंतर अपघात होईलच ही बाब तो गांभीर्याने घेत नाही व अपघात झाला तर विम्याचे पैसे संबंधिताना मिळतील याबाबत त्याला खात्री नसते. जर दुदैवाने एखाद्या कामगाराचा अपघाताने मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबीयांकडे अंत्यविधीसाठी देखील पैसे नसतात, ही बाब सर्वश्रुत आहे. ज्यावेळी एखादा अपघात होतो अशा वेळी कंत्राटदार हा स्वतः संबंधिताना मदत करतो. कंत्राटदार हा विम्याच्या हप्त्यापोटी स्वतःचे पैसे न भरता शासनाकडून मिळणाऱ्या देयकातून विमा कंपनीकडे भरतो, त्यामुळे विमाछत्राबाबतचा शासनाचा उद्देश पूर्ण होत नाही. ज्यावेळी कंत्राटदाराचे देयक सादर करण्यात येते त्यावेळी संबंधित यंत्रणा त्या देयकातून विम्यापोटीची रक्कम कपात करून विमा कंपनीकडे सादर करते. कामागारांचा विमा न उतरविल्याने गरीब कामगाराच्या कुटुंबीयाचे नुकसान होऊ नये म्हणून शासनाने योग्य पावले उचलली पाहिजे. निविदा मंजूर झाल्यानंतर कंत्राटदाराला वर्क ऑर्डर देण्यापूर्वीच विम्याची रक्कम भरावयास लावली पाहिजे. त्यावर विमा संचालनालयाच्या प्रतिनिधीनी समितीला माहिती दिली की, ज्यावेळी निविदा काढण्यात येते त्यावेळी किती कामगारांची कामासाठी आवश्यकता लागणार आहे, हे जर घोषित केले तर जास्तीत जास्त कामगारांना विमाछत्र उपलब्ध करून देणे शक्य होऊ शकते. कंत्राटदाराने कामाची वर्क ऑर्डर प्राप्त झाल्यानंतर विमा काढला नाही तर त्याच्या पहिल्या देयकातून विम्याची रक्कम कपात केली जाते. ही योजना शासनाच्या सहकार्याने जोपासण्यात येत आहे. कंत्राटदाराच्या देयकातून रक्कम जमा झाली असेल व काम सुरू झालेल्या कालावधीमध्ये अपघात झाला तर प्रिमिअम घेऊन विमा संरक्षण देण्यात येते.

आतापर्यंत विम्याच्या प्रिमियमची किती रक्कम जमा झालेली आहे, त्यातून किती दावे निकाली काढले गेलेले आहेत, याची वर्षनिहाय तसेच, कंत्राटदाराकडून कामापोटी कापून घेण्यात आलेल्या विम्याची रक्कम शासनाकडे जमा करण्यात आली आहे काय, नसल्यास का नाही.

तसेच विम्याच्या प्रिमियमच्या रकमेपैकी सर्व क्लेम सेटल करून आता किती रक्कम उरलेली आहे अतिवृष्टी किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे रस्ता वाहून गेला तर किंवा नादुरूस्त झाला तर तसेच कामगाराचा अपघात झाला तर विमा कंपनीकडून भरपाई मिळणे आवश्यक आहे काय, अतिवृष्टीमुळे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे रस्ता वाहून गेला किंवा कामगारास अपघात झाला असता अशा प्रकरणी विमा कंपनीने किती प्रकरणात नुकसानभरपाई दिली आहे नुकसानभरपाई दिलेली नसल्यास त्याची कारणे काय आहेत अशी विचारणा समितीने केली असता, विमा संचालनालयाच्या प्रतिनिधींनी सन २०१४-२०१५ च्या क्लेम सेटलमेंटची निश्चित रक्कम आता सांगता येणार नाही. दिनांक ०१ एप्रिल, २००९ ते ३१ मार्च, २०१४ पर्यंत जिल्हापरिषद बांधकाम विभाग, सिंधुदुर्ग यांनी रु. १,२३,५५,१२८ इतकी रक्कम शासकीय विमा निधी अंतर्गत जमा केली आहे. प्रत्यक्ष काम चालू असताना त्या कामावरील कामगाराचा अपघात झाल्यास त्या कामगारास विमा संरक्षण देय आहे. विमा उतरवलेल्या कामावर कामगारास अपघात घडल्याचे प्रकरण निदर्शनास आलेले नाही तसेच, कोणत्याही कामगाराने विमा संरक्षणाखाली नुकसानभरपाई मागितल्याचे निदर्शनास आले नाही. असे उत्तर दिले. विभागीय सचिवांनी सन २०१०-२०११ मध्ये विम्याची रक्कम २२,८५,८३,२७० रुपये जमा झाली होती. त्यातून ५,४७,००० रुपयांची रक्कम क्लेम सेटलमेंटकरिता वापरण्यात आली होती. सन २०११-२०१२ मध्ये २२,१८,२६,०७३ रुपये इतकी विम्याच्या प्रिमियमची रक्कम जमा झाली होती त्यातून ३ दावे सेटल करण्यातकरिता १९,१८,२६४ रुपयांची रक्कम वापरण्यात आली. सन २०१२-२०१३ मध्ये २६,४०,९८७ रुपये इतकी विम्याची रक्कम जमा झाली असून त्यातून सहा क्लेम सेटल करण्याकरिता १,६३,०६,१६१ रुपयांची रक्कम खर्च करण्यात आली होती. सहा क्लेमपैकी केवळ दोन क्लेम पात्र होते असे समितीसमोर स्पष्ट केले.

समितीने विम्याच्या प्रिमियमपैकी खर्च न झालेल्या रकमेमध्ये रस्ते सुधारण्याची योजना राबविणे आवश्यक आहे. रस्त्यांचे काम चालू असताना एका वर्षामध्ये रस्ते वाहून जात नाहीत किंवा खराब होत नाहीत, त्यामुळे रस्त्याच्या कामाच्या वेळेच्या मर्यादेमध्ये विमा काढला तर तो उपयोगाचा नाही. रस्ता बांधल्यानंतर तो वापरत असताना काही वर्षांकरिता विम्याचा कालावधी निश्चित केला तर त्याचा उपयोग व देखभाल व दुरुस्तीकरिता होईल असे मत प्रदर्शित केले.



**अभिप्राय व शिफारशी :-**

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेला समितीने भेट दिली असता समितीच्या निदर्शनास आले की, ग्रामीण भागातील बहुतांश रस्त्यांचा दर्जा खालावत चालला आहे. रस्त्याच्या कामामध्ये कंत्राटदारांनी एकूण कंत्राटाच्या १ टक्के रक्कम कामगार विम्यापोटी जमा करणे कायद्याने बंधनकारक आहे. परंतु बऱ्याच वेळा अशाप्रकारे विम्याची रक्कम कंत्राटदार भरतच नाहीत आणि जर भरली तर त्याद्वारे रस्त्याचे काम सुरू झाल्यापासून संपेपर्यंत एवढ्याच काळाकरिता कंत्राटदार विमा संरक्षण घेतात. परंतु कंत्राटदाराने सुरू केलेले रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंतच्या कालावधी ऐवजी तो रस्ता नादुरुस्त होईपर्यंतच्या कालावधीचे विमा संरक्षण कंत्राटदाराकडून न घेतल्यामुळे त्या कालावधीत जर रस्ता खराब झाल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदाराची रहात नाही. परिणामी, राज्यातील बहुतांश रस्ते नादुरुस्त अवस्थेत दिसून येतात आणि त्याची जबाबदारी शासनावर येते. **या संदर्भात समिती शासनास खालील शिफारशी करीत आहे :—**

**(१) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून एखादी निविदा मंजूर झाल्यानंतर कंत्राटदाराला प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर कामाचे कार्यादेश देण्यापूर्वी सदरहू कामास जेवढ्या कामगारांची आवश्यकता लागणार आहे. तेवढ्या कामगारांच्या विम्याची रक्कम कंत्राटदाराने शासनाकडे भरणे अनिवार्य करावे.**

**(२) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करावयाचे काम जेवढा काळ सुस्थितीत राहणे आवश्यक आहे तेवढ्या काळासाठी त्या संपूर्ण कामाचा विमा संबंधित कंत्राटदाराने विमा संचालनालयाकडून उतरविणे अनिवार्य करावे.**

**(३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून राज्यात मागील ५ वर्षात झालेल्या कामांमध्ये विम्याची किती रक्कम जमा झाली आहे व त्यातून विम्याचे किती दावे निकाली काढण्यात आले आहेत याची वर्षनिहाय माहिती तीन महिन्याच्या आत समितीस सादर करावी.**

**(४) तसेच विम्याच्या प्रिमियम रकमेतील अखर्चित रक्कम रस्ते दुरुस्ती सुधार योजनेवर खर्च करण्याबाबत आदेश काढून ते सर्व संबंधितांना निर्गमित करण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी.**

**२.३ नेरुर कार्यात नारुर रस्ता डांबरीकरण तथा नूतनीकरण (परिच्छेद ३.१४(८) जिल्हा परिषद सिंधुदुर्ग सन २००९-२०१० (परिच्छेद क्रमांक ५(१) -**

बांधकाम विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्गने हस्तांतरीत योजनेतुन उपरोक्त कामाचे प्राकलन रक्कम रुपये १९,९८,९१८ करून त्यास प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी देऊन ठेकेदारामार्फत सदरचे काम करून घेऊन सदर कामावर रक्कम रुपये १९,१९,९१८ खर्च करण्यात आलेला आहे. त्याबाबत लेखा परिक्षकांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत :—

(१) सदर रस्त्यावर ३ ठिकाणी आरसीसी पाईप बसवण्याचे काम प्राकलनाचे सर्वसाधारण वर्णनात नमूद असून त्याप्रमाणे मोजमाप नोंदवहीत झालेल्या कामाची नोंद आहे. तथापि याजागी पूर्वी बसवलेले पाईप कार्यालयात जमा करून त्याची नोंद घेणे आवश्यक आहे.

(२) देयकासोबत जोडलेल्या पूर्णत्वाच्या दाखल्यात सदरचे काम मार्च, २०१० मध्ये पूर्ण झाल्याची कार्यकारी अभियंता/शाखा अभियंता व उप अभियंता यांच्या स्वाक्षरीसह नोंद आहे. तथापि मोजमाप नोंदवही पृष्ठ क्रमांक १८ वर दिनांक ३०-०३-२०१० रोजी कार्यकारी अभियंता यांनी आपले माहितीप्रमाणे काम झाले असल्याचे परंतु वाढत्या कामाच्या व्यापामुळे सदर देयकाची टक्केवारी तपासणी पुढील देयकात केली जाईल असा शेरा नोंदविला आहे. तरी सदरचे काम पूर्ण असताना व त्याप्रमाणे शाखा अभियंता व उप अभियंता यांनी तसा पूर्णत्वाचा दाखला दिला असताना कार्यकारी अभियंता यांनी टक्केवारी तपासणी केलेली नाही.

(३) कामासाठी वापरलेली खडी, डांबर यांचे चाचणी अहवाल हे मोजमाप तारखेनंतर घेतलेले आहेत.

वरील आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी स्वरुपात माहिती प्राप्त झाली.

(१) पूर्वी बसविणेत आलेले पाईप अतिजीर्ण व निरुपयोगी असल्याने पुन्हा वापरात येण्याजोगे नव्हते. त्यामुळे सदर पाईप काढून टाकून, त्याठिकाणी नविन पाईप बसविण्यात आलेले आहेत.

(२) देयकासोबत पूर्णत्वाचे दाखले जोडण्यात आलेले होते. परंतु कामाच्या व्यापामुळे पहाणी करता येत नसल्याने कार्यकारी अभियंता यांनी टक्केवारी तपासलेली नाही. सद्यःस्थितीत अंतिम देयक दिनांक २०-७-२०१३ रोजी खर्च घालणेत आलेले आहे.

(३) कामासाठी वापरलेली खडी, डांबर यांचे नमुने वेळेवर तपासणीसाठी पाठविणेत आलेले होते. त्यांचेकडील कामाच्या व्यापामुळे अहवाल विलंबाने या कार्यालयाकडे प्राप्त झालेले होते.



अहवाल प्राप्त न झालेने पहिल्या देयकातून रु. १,००,००० एवढी रक्कम सुरक्षा अनामत ठेवण्यात आलेली होती.

सद्यःस्थितीत काम सुस्थीतीत असून, आता कपात केलेली रक्कम अदा करणेत आलेली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

समितीने दिनांक १७ जुलै,२०१४ रोजी सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेस भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी कामासाठी वापरलेली खडी, डांबर यांचे नमुने वेळेवर तपासणीसाठी पाठविण्यात आले होते, डांबरामध्ये फर्नेस ऑईल मिक्स केलेले असते त्यामुळे रस्त्याचा दर्जा चांगला राहत नाही. डांबरात कोणते पदार्थ मिक्स केलेले आहेत, याबाबतचे पृथःकरण करण्यासाठी आपल्या राज्यात प्रयोग शाळा नाही. आपल्याकडे केवळ डांबराची तपासणी करून त्याची ग्रेड ठरविली जाते. पूर्वी करण्यात आलेले रस्ते आजही सुस्थितीत आहेत. परंतु आता जे रस्ते तयार केले जातात ते ३-४ महिन्यातच उखडतात. त्याचे कारण डांबरामध्ये मिक्सींग केलेले असते, त्यामुळे आपल्या राज्यातही अशा प्रकारची अत्याधुनिक प्रयोग शाळा नसल्याने आपल्याकडे त्याचा फक्त दर्जा निश्चित केला जातो. त्याचे पृथःकरण करण्याची सुविधाच उपलब्ध नाही असे समितीने प्रतिपादन केले.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे खालील मुद्यांबाबत जिल्हा परिषदेकडून अधिक माहिती मागविली.**

(ख) डांबरामध्ये कोणते पदार्थ मिसळले आहेत याची तपासणी करण्यासाठी राज्यात प्रयोगशाळा आहेत काय, (ग) डांबरातील भेसळ तपासण्याकरिता राज्यात अत्याधुनिक प्रयोगशाळा निर्माण करण्याबाबत राज्याचे धोरण काय आहे, (घ) डांबरामध्ये फर्नेस ऑईलची भेसळ होवून रस्त्याचा दर्जा चांगला राहत नाही, हे खरे आहे काय ?

उपरोक्त प्रश्नांच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून (ख) रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात अशी प्रयोगशाळा नाही. (ग) सिंधुदुर्ग जिल्हा परिषद बांधकाम विभागाशी ही बाब निगडीत असल्याने समर्पक उत्तर देता येत नाही. (घ) कामाची तपासणी करताना कामाचे टेस्ट रिपोर्ट घेतले जात असल्याने सदर अहवालावरुन कामाची गुणवत्ता व दर्जा चांगला आहे याची खात्री केली जाते अशी लेखी माहिती प्राप्त झाली.

उपरोक्त प्रश्नांच्या अनुषंगाने ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडून जिल्हा परिषद बांधकाम विभाग, सिंधुदुर्ग यांनी कोणालाही दोषी धरलेले नाही. त्यामुळे कार्यवाहीची आवश्यकता नाही, अशी लेखी माहिती प्राप्त झाली.

सार्वजनिक बांधकाम विभाग - (ख) डांबरीकरणाच्या कामात वापरावयाच्या पुंजीत डांबरामध्ये भेसळ झाल्यास डांबराची तपासणी करण्याची यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे उपलब्ध आहे. (ग) दक्षता व गुण नियंत्रण प्रयोगशाळेत अत्याधुनीक यंत्र सामुग्री कार्यान्वित करण्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे धोरण आहे. (घ) होय, डांबरामध्ये भेसळ झाल्यास रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाचा दर्जा खालावतो ही वस्तुस्थिती आहे. अशी लेखी अधिक माहिती प्राप्त झाली.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १६ जून, २०१५ रोजी संबंधित विभागाची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस माहिती देताना, राज्यात जवळपास ५० हजार कोटी रुपयांची रस्त्यांची कामे केली जातात, परंतु डांबरात भेसळ आहे की नाही हे तपासण्यासाठी कोठेही प्रयोगशाळा नाही. याची तपासणी तिऱ्हाईताकडून करून घेतली पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यात अशा प्रकारची प्रयोगशाळा सुरू करण्याची आवश्यकता आहे. यासंबंधी शासनाने तातडीने उपाययोजना करावी असे समितीने मत प्रतिपादन केले.

या कामाची तपासणी तिऱ्हाईताकडून तसेच शासकीय महाविद्यालयातून करण्याची आवश्यकता आहे. रस्त्यांवर पडलेल्या खड्डयांमुळे अपघात होऊन हजारो लोक मृत्युमुखी पडले आहेत. शासन या बाबींकडे फारसे गांभीर्याने बघत नाही. रस्ते चांगल्या दर्जाचे तयार होत नसल्यामुळे या रस्त्यांवर लवकर खड्डे पडतात, म्हणून या कामाची तपासणी करण्यासाठी गुणवत्ता नियंत्रण पथक स्थापन करण्याची आवश्यकता आहे. कारण डांबरामध्ये फर्नेसाईल, रॉकेल अशा द्रव पदार्थांची भेसळ केली जाते.

रस्त्याच्या कामामध्ये कोणत्या प्रकारचे भेसळ झाली हे पाहण्यासाठी विविध प्रकारचे तंत्रज्ञान उपलब्ध झालेले आहे. तपासणीसाठी नमुना घेऊन नंतर त्याचा अहवाल येणार यामध्ये वेळ जाणार आहे. ज्यावेळी काम सुरू असते त्याचवेळी तपासणी केली तर शासनाच्या पैशाचा उपयोग होईल. जर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले तर ठेकेदार व कार्यकारी अभियंता यांच्यावर देखील कारवाई करण्याची आवश्यकता असून पाच वर्षाच्या आत रस्त्यावर खड्डे पडले तर त्याची जबाबदारी ठेकेदारावर निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच सर्व कामांची तपासणी तिऱ्हाईताकडून करणे आणि प्राधान्याने ती शासकीय महाविद्यालयातून करणे आवश्यक आहे असे समितीने विभागीय सचिवांना निर्देशित केले. सदरहू सूचनांच्या अनुषंगाने विभागीय सचिवांनी, रस्त्याच्या वेगवेगळया चाचण्या घेतलेल्या आहेत. खडीची चाचणी घेतलेली आहे, पेनीट्रेशन चाचणी घेतलेली आहे. जर



डांबरामध्ये फर्नेस मिक्स केले असेल तर या चाचण्यांचे अहवाल बरोबर येणार नाहीत. डांबरामध्ये काहीही भेसळ केले असेल तर या चाचण्या समाधानकारक होणार नाहीत असे उत्तर दिले.

राज्यात ३५ ठिकाणी प्रयोगशाळा असून त्यात डांबर तपासणीचे काम होते. डांबरामध्ये भेसळ असेल तर त्याची चाचणी घेण्यात येते आणि त्यात भेसळीचे प्रमाण किती आहे हे त्यावरुन स्पष्ट होते. भेसळयुक्त डांबर असेल तर त्याचा परिणाम रस्त्याच्या कामावर होतो. ज्या ठिकाणी काम सुरू असते तेथील डांबर काढून ते तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविले जाते. त्याच्या काही चाचण्या साईटवर देखील होतात. तपासणी अहवालामध्ये डांबराचे प्रमाण कमी आढळून आले तर ते काम रद्द करावे लागते. शासनमान्य डांबरच खरेदी करून वापरण्यात येते. प्रयोगशाळेमध्ये त्याच्या वेगवेगळ्या चाचण्या घेतल्या जातात. त्यात निकाल चुकीचा आला तर ते डांबर स्वीकारले जात नाही. रस्त्याचे डांबरीकरणाचे काम सुरू असताना त्या ठिकाणी शाखा अभियंता, सहायक अभियंता यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच शासनमान्य तीन कंपन्यांकडूनच डांबर घेण्यात यावे अशा प्रकारच्या सूचना पुन्हा एकदा देण्यात येतील असे विभागीय सचिवांनी समिती समक्ष स्पष्ट केले.

तद्नंतर समितीने पुन्हा दिनांक १ जुलै, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी पंतप्रधान ग्रामसडक योजनेचे नियम आपल्या रस्त्यांच्या कामाला लागू करण्यात येतील काय, तसे करणार नसाल तर राज्याच्या रस्त्यांची स्थिती आहे तशीच राहील आणि किमान पाच वर्ष रस्ता खराब होणार नाही अशी अट शासनाने समाविष्ट केली तर बरे होईल. यावर विभागाय सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, पंतप्रधान ग्रामसडक योजनेची देखभाल/दुरुस्तीसंबंधातील नियम आहेत ते आपल्या येथे लागू करण्यासंबंधात अभ्यास करण्याचे काम सुरू आहे. त्यासंबंधातील धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.

**अभिप्राय व शिफारशी :-**

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेली माहिती तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेली माहिती विचारात घेता समितीच्या असे निदर्शनास आले की, राज्यात हजारो कोटी रुपयांची रस्त्याची कामे केली जातात. तथापि, डांबरातील भेसळ तपासण्यासाठी राज्यात कोठेही प्रयोगशाळा नाही, त्यामुळे तयार करण्यात आलेल्या रस्त्यांचा दर्जा निकृष्ट असल्याने त्यावर खड्डे पडून माणसांना व वाहनांना सतत अपघात होत असतात व त्यामुळे जीवित व वित्त

हानीही होत असते. त्याचप्रमाणे शासनाचा मोठ्या प्रमाणात निधी खर्च होत असतो. विशेषतः ग्रामीण भागातील डांबरी रस्ते प्रवासासाठी सुरक्षित नाहीत. कारण राज्यातील डांबरी रस्त्याच्या कामांसाठी वापरण्यात येणाऱ्या डांबरात फर्नेस ऑईल आणि रॉकेल यांची भेसळ केलेली असल्यामुळे त्याद्वारे तयार केलेले रस्ते निकृष्ट दर्जाचे व तकलादू असतात. **सबब, डांबरातील भेसळ तपासणे व रस्त्यांच्या दर्जा चांगला राहावा यासाठी समिती खालील प्रमाणे शिफारशी करीत आहे.**

**(१) केंद्र शासनाच्या ३ ऑईल कंपन्यांचेच डांबर विकत घेणे तसेच या पुढील काळात शासकीय कंत्राटदारांवर उक्त कंपन्यांचे खरेदी देयक जोडणे अनिवार्य करण्यात यावे,**

**(२) रस्त्याच्या कामाच्या ठिकाणी (साईटवर) डांबर तपासण्यासाठी फिरत्या (मोबाईल) प्रयोगशाळा निर्माण करून, प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी शासकीय महाविद्यालयातूनच डांबराची गुणवत्ता तपासणी करणे अनिवार्य करावे अथवा प्रत्येक जिल्ह्यात दर्जा नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात यावा व त्याद्वारे डांबर तपासणी वेळोवेळी करण्यात यावी,**

**(३) ज्या रस्त्याचे डांबरीकरण झाले आहे त्या रस्त्यावरील डांबरीकरणाची स्थिती व त्याची तपासणी कुठे केली इ. तपशील उक्त रस्त्याच्या दर्शनी भागावर एका लोखंडी फलकावर लावून परिसरातील जनतेला रस्त्याच्या कामाची डांबरीकरणाच्या साहित्य तपासणीची माहिती उपलब्ध करून देणे अनिवार्य करावे.**

**(४) राज्यातील रस्त्याचे काम कंत्राटातील मुदतीपूर्वी खराब / निकृष्ट दर्जाचे झाल्यास संबंधित कंत्राटदार व संबंधित अभियंत्यांवर जबाबदारी (defect liability) निश्चित करण्यात यावी,**

**(५) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये (PMGSY) ज्याप्रमाणे रस्त्याची गुणवत्ता व दर्जा चांगला राहावा यासंबंधाने तरतूदी आहेत. त्या सर्व जशाच्या तशा राज्यातील रस्त्यांच्या कंत्राटामध्ये देखील लागू करण्यात याव्यात.**

**उर्वरित शिफारशी विचारात घेऊन एकच सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी.**

# परिशिष्ट - " अ "

## शासनाचे आदेश व परिपत्रके

जिल्हा परिषदांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या महिला व बाल कल्याण समितीने राबवावयाच्या योजनांबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः झेडपीए २०१३/प्र.क्र. ७६/पंरा-१**
बांधकाम भवन, तळमजला
२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१
दिनांक : २४ जानेवारी, २०१४

वाचा-
१) शासन निर्णय क्रमांकः झेडपीए २०१०/अनौसंक्र.३३/प्र.क्र.१६८/पंरा-१, दिनांक १० मार्च २०११.
२) शासन शुध्दीपत्रक क्रमांकः झेडपीए २०१०/अनौसंक्र.३३/प्र.क्र.१६८/पंरा-१, दिनांक २२ जुलै, २०११.
३) शासन शुध्दीपत्रक क्रमांकः झेडपीए २०१२/३८१/प्र.क्र. ८२/पंरा-१, दिनांक १६ जून, २०१२.
४) शासन निर्णय क्रमांकः झेडपीए २०१२/९८७/प्र.क्र. २०० /पंरा-१, दिनांक १३ मार्च, २०१३.
५) शासन परिपत्रक क्रमांकः झेडपीए २०१३/प्र.क्र. ०७/पंरा-१, दिनांक २१मार्च, २०१३.

**शासन निर्णय -**

महिला व बाल विकासाशी संबंधित विविध कार्यक्रम राबविण्यासाठी सर्व जिल्हा परिषदांमध्ये महिला व बाल कल्याण समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. या समितीने राबवावयाचे कार्यक्रम/योजना संदर्भाधिन शासन निर्णयानुसार राबविण्यात येतात. तथापि या योजनांमध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे, असे शासनाच्या निदर्शनास आल्याने संदर्भाधिन सर्व शासन निर्णय, शुध्दीपत्रक व परिपत्रकांचे एकत्रिकरण करुन सुधारित आदेश पारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. महिला व मुलींना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी जिल्हा परिषद क्षेत्रात महिला व बाल कल्याण समित्यांमार्फत जिल्हा परिषद उत्पन्नाचे १० टक्के निधीतून खालील योजना सक्षमपणे राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. निधी व शासकिय अनुदानातुन, पंचायत समितीनी पंचायत समिती उत्पन्नाचे १० टक्के मधून व ग्रामपंचायतींनी ग्रामपंचायतीचे उत्पन्नाचे १० टक्के निधीमधून खालील योजना सक्षमपणे राबविण्यासाठी यापुर्वीचे शासन निर्णय, शुध्दीपत्रके व परिपत्रके अधिक्रमित करुन पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

**गट "अ" प्रशिक्षण व सक्षमीकरणाच्या योजना :-**

**१) मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण :-**

महिला व मुलींना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षणासाठी सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षणाच्या योजना राबवाव्यात. केंद्र शासनाचे उद्योजकता विकास व तांत्रिक प्रशिक्षण, कौशल्य वृध्दी उपक्रम, व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम इ. योजने अंतर्गत व त्यांचे मार्फत प्रशिक्षण आयोजित करावे. व्होकेशनल ट्रेनिंग प्रोव्हायडर व कोर्सची माहिती www.sdi.gov.in & www.dget.nic.in/mes या वेबसाईटवर उपलब्ध आहे. व्यक्तीमत्व विकास, ब्युटी पार्लर प्रशिक्षण, केटरींग, बेकिंग अशा विशिष्ट पध्दतीच्या स्वयंपाकाचे प्रशिक्षण, दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन, फुड प्रोसेसिंग, शिवणकाम व फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण, संगणक दुरुस्ती, मोटार ड्रायव्हींग, मराठी /इंग्रजी टायपिंग, इमिटेशन ज्वेलरी मेकींग, लघुलेखन, सेल्स गर्ल, विमा एजंट, परिचारिका (नर्स) प्रशिक्षण, घनकचरा प्रशिक्षण व बायोगॅस (कचऱ्यापासून खत निर्मीती, गांडूळखत, कचऱ्याचे विभाजन व



व्यवस्थापन), रोपवाटीका तसेच शोभिवंत फुलझाडांची व औषधी वनस्पतींची लागवड व विक्री, इत्यादी प्रशिक्षण स्थानिक पातळीवरील गरज लक्षात घेवून प्रशिक्षण आयोजित करावीत. या योजनेखाली मान्यताप्राप्त संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना प्रति लाभार्थी रु. ५,०००/- पर्यंत महिला व बाल कल्याण समितीस खर्च करता येईल. प्रशिक्षण शुल्काच्या रक्कमेच्या १० टक्के रक्कम लाभार्थ्यांने स्वत: भरावी. प्रशिक्षण कालावधी जास्तीत जास्त १ वर्षाचा असावा. तसेच मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देण्याबरोबरच त्यांना राज्यातील विविध शासकीय / निमशासकीय कार्यालयातील रिक्त पदे व महिलांसाठी आरक्षित ३० % पदे याबाबतची माहिती देण्यात यावी. त्यांना सदर पदांसाठी अर्ज उपलब्ध करुन देणे आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी आवश्यक ती फी उपलब्ध करुन देणे. अशा पदांसाठी असलेल्या स्पर्धा परिक्षासाठी प्रशिक्षण देणे व सरावासाठी / अभ्यासासाठी पुस्तके उपलब्ध करुन देण्यासाठी तालुकास्तरावर वाचनालय सुरु करणे. त्याचप्रमाणे या संदर्भात प्रथमत: महिन्यातून एकदा व जास्त प्रतिसाद लाभल्यास पंधरा दिवसातून / आठवड्यातून एकदा जिल्हा स्तरावर / तालुका स्तरावर मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात यावे.

**२) मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारिरीक विकासासाठी प्रशिक्षण :-**

महिला व मुलींवर होणारे अन्याय, त्यांचे होणारे लैंगिक शोषण अश प्रकारच्या अत्याचारांना सक्षमपणे तोंड देता यावे, यासाठी इयत्ता ४ ते १० वी पर्यंतच्या व महाविद्यालयातील मुलींना तसेच शाळेतील इच्छूक महिला शिक्षकांना ज्युडो कराटे, योगाचे सहा महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात यावे. सदर प्रशिक्षण स्थानिक ग्रामपंचायत व शाळा व्यवस्थापन समिती यांच्या मान्यतेने आयोजित करावे. या योजनेअंतर्गत प्रत्येक प्रशिक्षणार्थीवर जास्तीत जास्त रु. ६००/- (रु. सहाशे फक्त) पर्यंत खर्च करण्यात यावा. या योजनेवर पूर्ण नियंत्रण महिला व बाल कल्याण समितीचे राहील. या प्रशिक्षणासाठी ज्युडो, कराटे व योगाचे प्रशिक्षण पुर्ण केलेल्या व जिल्हा क्रिडा अधिकारी यांचे प्रमाणपत्र असलेल्या प्रशिक्षकाची निवड करण्यात येईल.

**३) महिलांसाठी समुपदेशन केंद्र :-**

कुटूंबातील मारहाण, लैंगिक छळ व इतर तऱ्हेने त्रासलेल्या तसेच मानसिकदृष्टया असंतुलित महिलांच्या सामाजिक, मानसशास्त्रीय, कायदेशीर समुपदेशनासाठी सदर योजना राबवावी. समुपदेशन केंद्र स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविणेत यावे. यासाठी समुपदेशक व विधी सल्लागार यांच्या मानधनावर खर्च करणेत यावा. स्वयंसेवी संस्थेची निवड त्रिसदस्यीस समिती मार्फत करण्यात येईल. मुख्य कार्यकारी अधिकारी हे त्या समितीचे अध्यक्ष, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) हे सचिव व समाज कल्याण अधिकारी हे सदस्य असतील.ज्या संस्थेकडे यापूर्वीच अशा प्रकारच्या समुपदेशनसाठी आवश्यक मनुष्यबळ, आर्थिक क्षमता, जागा, अनुभव व सोईसुविधा उपलब्ध असतील, अशा संस्थांना प्राधान्य देण्यात यावे. जिल्हा स्तरावरील समुपदेशन केंद्रात एक समुपदेशक व एक विधी सल्लागार कार्यरत असावेत. तालुकास्तरावरील समुपदेशन केंद्रात एक समुपदेशक व एक विधी सल्लागार कार्यरत असावेत. जिल्हा पातळीवरील समुपदेशक व विधी सल्लागार यांना दरमहा प्रत्येकी रु. १२०००/- पर्यंत मानधन देणेत यावे. तालुका पातळीवरील समुपदेशक व विधी सल्लागार यांना दरमहा प्रत्येकी रु. ९०००/- पर्यंत मानधन देणेत यावे.

यापुर्वी जिल्हा स्तरावर व पंचायत स्तरावर कार्यरत असणाऱ्या समुपदेशक व विधी सल्लागार यांना यापुढे वाढीव मानधन देणेत यावे. नव्याने समुपदेशन केंद्र स्थापन करावयाचे झाल्यास वृत्तपत्रात जाहिरात देवून समुपदेशन केंद्र स्थापन करणेत यावे. यासाठी स्वयंसेवी संस्थेची निवड करताना संबंधित संस्थेकडे आवश्यक मनुष्यबळ, आर्थिक क्षमता, जागा व सुविधा असाव्यात. ज्या संस्थेकडे जागा नाही,

त्या संस्थेस जागा जिल्हा परिषद, पंचायत समितीमार्फतही उपलब्ध करुन देता येईल. नव्याने समुपदेशन स्थापन करावयाचे झाल्यास राज्य महिला आयोगाची सहमती घ्यावी. समुपदेशन केंद्राशी महिलांना संपर्क साधता यावा, यासाठी जिल्हा परिषद/ पंचायत समितीमार्फत दुरध्वनीची सुविधा उपलब्ध करुन द्यावी. दुरध्वनी व इतर कार्यालयीन खर्चासाठी दरमहा जास्तीत जास्त रु. १०००/- इतकी रक्कम खर्च करण्यात येईल. समुपदेशक व विधी सल्लागार यांचे मानधनाची रक्कम संबंधित संस्थेच्या नावे धनादेशाद्वारे अदा करण्यात येईल.

**४) इयत्ता ७ वी ते १२ वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण :-**

शासकिय व निमशासकिय नोकरीसाठी एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षण अनिवार्य आहे. संगणकाबाबतचे ज्ञान, कौशल्य प्राप्त करण्यासाठी इयत्ता ७ वी व १२ वी पास मुलीना एम.एस.सी.आय.टी., सी. सी. सी. व समकक्ष असणारे प्रशिक्षण देणेसाठी सदरहू योजना उपयुक्त राहील.एमएससीआयटी प्रशिक्षण हा कार्यक्रम महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, मुंबई (एम.के.सी.एल.) यांचेकडे हस्तांतरीत केलेला असल्याने या महामंडळाचे अधिकृत प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण आयोजित करावे. या परिक्षेचे फॉर्म ऑनलाईन भरावे लागत असुन परिक्षा व प्रशिक्षण शुल्क फी आगाऊ भरावी लागते, त्यामुळे प्रशिक्षण संस्थांना आगाऊ रक्कम अदा करून प्रशिक्षण पुर्ण करता येईल. परिक्षा व प्रशिक्षण फी यामध्ये वारंवार होणारे बदलाप्रमाणे ही रक्कम निश्चित करावी. या योजनेचा लाभ दारिद्रय रेषेखालील कुटुंब तसेच ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ५०,०००/- पर्यंत असलेल्या कुटुंबातील मुलींना प्राधान्याने देण्यात यावा.

**५) तालुकास्तरावर शिकणाऱ्या मुलींसाठी होस्टेल चालविणे :-**

ग्रामीण भागात माध्यमिक शाळा नसल्यामुळे ८ ते १० तसेच महाविद्यालयात शिकणाऱ्या मुलींना शिक्षण घेणाऱ्या मुलींना शिक्षण घेण्यासाठी स्वत:च्या गावांपासून लांब अंतरावर जाऊन रहावे लागते. तालुक्याच्या ठिकाणी जेथे माध्यमिक शाळा किंवा महाविद्यालय असतात, तेथे अशा मुलींना वसतीगृह उपलब्ध करुन दिल्यास मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढेल. या योजनेखाली वसतीगृह इमारतीचे बांधकाम न करता, भाड्यावर इमारत / घर / फ्लॅट घेण्यात यावेत.सदर वसतीगृह स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात यावीत. फक्त भाडे व प्रशासकीय खर्चासाठी अर्थसहाय्य देण्यात यावे. जेवणाचा खर्च लाभार्थ्यांनी सोसावा. त्याशिवाय लाभार्थींकडून कोणतीही फी घेऊ नये. कमीतकमी १० मुलींसाठी एक वसतीगृह असावे. प्रशासकीय खर्चाची मर्यादा महिला व बाल कल्याण समितीने निश्चित करावी. तथापी प्रति लाभार्थी प्रति माह रु. ५००/- (रुपये पाचशे फक्त) पेक्षा (भाडे वगळून) जास्त असणार नाही.

**६) किशोरवयीन मुलींना व महिलांना जेंडर, आरोग्य, कुटुंबनियोजन, कायदेविषयक प्रशिक्षण :-**

शाळा व महाविद्यालयातील किशोरवयीन मुलींचा विकास व सक्षमीकरण व्हावे , पोषण व आरोग्य विषयक दर्जा सुधारावा, त्याचप्रमाणे स्वच्छता, प्रजनन व लैंगिक आरोग्य, कुटूंब व बालकांची काळजी घेणे याविषयी किशोरींमध्ये जाणीव व जागृती निर्माण व्हावी, जीवनकौशल्ये, गृहकौशल्ये व व्यवसाय कौशल्ये, याबाबत किशोरींना मार्गदर्शन मिळावे, किशोरवयीन मुलींमध्ये आत्मविश्वास वाढावा, किशोरवयीन मुलींना विविध कायदेविषयक तरतुदींची माहिती मिळावी, म्हणुन प्रतिवर्षी अंगणवाडी पर्यवेक्षिका, विधी तज्ञ, अनुभवी व संवेदनशील तज्ञ मार्गदर्शक यांचेमार्फत प्रशिक्षण शाळा आयोजित कराव्यात. यासाठी या तज्ञ मार्गदर्शकांना रु. २००/- ते ५००/- पर्यंत मानधन देणेत यावे. त्याचे स्वरुप स्थानिक आवश्यकतेनुसार ठरविण्यात यावे. माता सक्षमीकरण, गरोदर माता, किशोरवयीन मुलींना लसीकरण, माता समिती बैठका व आहार विषयक मार्गदर्शन असे कार्यक्रम आयोजित करावेत. यासाठी खर्चाची मर्यादा महिला व बाल विकास समिती यांनी निश्चित करावी.



**७) अंगणवाड्यांसाठी स्वतंत्र इमारत/भाडे :-**

एकात्मिक बाल विकास विभागामार्फत मंजूर केलेल्या अंगणवाडींची संख्या मोठया प्रमाणात आहे. बऱ्याच अंगणवाडया उघडयावर, देवालय, समाजमंदीर, खाजगी इमारतीत जागा भाडेपट्टयाने घेऊन भरविण्यात येतात. ज्या ठिकाणी अंगणवाडयांना स्वतंत्र इमारत नाही, अशा ठिकाणी नविन अंगणवाडी इमारत बांधकामासाठी रक्कम रुपये ४.५० लक्ष पर्यंत निधीची तरतुद करणेत यावी. महिला व बाल कल्याण विभागाने अंगणवाडी इमारत बांधकामामध्ये वाढ केल्यास, त्याप्रमाणे महिला व बाल विकास समितीस अंगणवाडी इमारत बांधकाम खर्चात वाढ करता येईल. जेथे अंगणवाड्यांसाठी जागा भाड्याने घेतलेल्या आहेत, अशा जागांचे भाडेमूल्य सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी निश्चित केलेल्या दरानुसार अदा करता येईल.

**८) बालवाडी व अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका, यांना पुरस्कार देणे:-**

बालवाडी व अंगणवाडीमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका यांना आदर्श पुरस्कार देता येईल. या योजनेसाठी वार्षिक रु. ३.०० लक्ष पर्यंत खर्च करता येईल.

**९) पंचायत महिला शक्ती अभियान अंतर्गत पंचायत राज संस्थामधील महिला लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण व महिला मेळावे व मार्गदर्शन केंद्र :-**

पंचायत संस्थांमध्ये महिलांना ५०% जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने त्यांची क्षमताबांधणी होणे आवश्यक आहे. पंचायत महिला शक्ती अभियान अंतर्गत पंचायत राज संस्थामधील तिन्ही स्तरातील महिला लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण मिळावे यासाठी जिल्हा परिषदेतील महिला व बाल विकास विभागात मार्गदर्शन केंद्र स्थापन करणेत यावे. या मार्गदर्शन केंद्रात एक एम.एस.डब्ल्यु. चे संगणक कौशल्य असलेल्या मार्गदर्शकाची कंत्राटी पध्दतीने मानधनावर नेमणुक करावी. यासाठी अर्ज मागणी करून मुलाखतीद्वारे त्रिसदस्यीय समितीमार्फत निवड करावी. या समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे अध्यक्ष, उप-मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) हे सचिव व समाजकल्याण अधिकारी हे सदस्य असतील. या मार्गदर्शकाचे मानधन दरमहा रुपये १५,०००/- पर्यंत असावे. या केंद्रात दूरध्वनीची सुविधा असावी व त्यासाठी खर्चाची तरतूद करावी. या केंद्रामार्फत महिला सदस्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. (उदा. क्रांतीज्योती धर्तीवरील प्रशिक्षण) तसेच महिला प्रतिनिधींसाठी प्रशिक्षण व महिला मेळावे आयोजित करावे. यासाठी वार्षिक रु. १०.०० लक्ष पर्यंत तरतुद करता येईल.

**१०) बालवाडी व अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका यांचे प्रशिक्षण :-**

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत बालवाडी व अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका यांचे प्रशिक्षणासाठी तरतुद करणेत यावी. यासाठी किती तरतुद असावी, याबाबत महिला व बाल कल्याण समितीने निर्णय घ्यावा.

**११) विशेष प्राविण्य मिळविलेल्या मुलींचा सत्कार :-**

राज्यस्तरावर क्रिडा, कला, शिक्षण अशा विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविलेल्या मुलींचा सत्कार करण्यात यावा. यासाठी निधीची तरतूद करावी. पुरस्काराचे स्वरुप महिला व बाल कल्याण समितीने ठरवावे. तसेच आर्थिकदृष्टया दूर्बल घटकातील (BPL) विशेष प्राविण्य मिळविलेल्या मुलींचा सत्कार करण्यात यावा व त्यांना १२ वी नंतरच्या उच्च शिक्षणासाठी आवश्यक आर्थिक मदत करण्यात यावी. याबाबतची रक्कम महिला व बाल कल्याण समितीने निश्चित करावी.

**१२) महिला व बालकल्याण समिती सदस्यांचा दौरा :-**

समितीस स्वतःच्या निधीमधून ग्रामपंचायत, पंचायत समिती, व जिल्हा परिषदेमध्ये निवडून आलेल्या महिला लोकप्रतिनिधींचे पंचायत राज, आदर्श गाव, निर्मल ग्राम, महिला बळकटीकरण, महिला व विकासाचे उपक्रम इ. विषयांची माहिती घेण्यासाठी अभ्यास सहलीचे राज्यांतर्गत आयोजन करावे. महिला लोकप्रतिनिधींना नाविन्यपूर्ण योजनांची माहिती घेण्यासाठी राज्याबाहेरील दौऱ्याचे आयोजन करता येईल. राज्यांतर्गत व राज्याबाहेर अशा सहलींसाठी प्रतिवर्ष जास्तीत जास्त रु. ५.०० लक्ष पर्यंत खर्च मर्यादा विहित करण्यात येत आहे.

**गट "ब" च्या योजना (वस्तु खरेदीच्या योजना)**

**१३) अंगणवाडींना विविध साहित्य पुरविणे.**

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेखालील अंगणवाडयांना एकात्मिक बाल विकास सेवेकडून विविध साहित्य पुरविण्यात येते. मात्र हे साहित्य अपूरे पडते त्यामुळे या अंगणवाडीतील, मिनी अंगणवाडीतील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी साहित्याची आवश्यकता असल्यास यावरील खर्च जिल्हा परिषदेने स्वतःच्या/ शासन निधीतून करावा. सदर साहित्यामध्ये शैक्षणिक व बौध्दीक विकासाला चालना देणारी विविध प्रकारची खेळणी, शारिरिक विकासासाठी आवश्यक खेळाचे साहित्य, शैक्षणिक तक्ते, चाईल्ड ट्रॅकिंग सॉफ्टवेअर, प्रौढ वजनकाटे, इलेक्ट्रॉनिक वजनकाटे, इन्फेंटोमीटर, स्टेडीओमीटर, जलशुध्दीकरण यंत्रे, टेबल खुर्ची, कपाटे, चप्पल स्टॅंड, स्टील डिशेस, चमचे, ग्लास, सतरंजी, बस्करपट्टी, डिजिटल टिव्ही, संगणक, अंगणवाडीतील मुला/मुलींना गणवेश वाटप इ. साहित्य पुरविण्यात येईल. अंगणवाड्यांना विज कनेक्शन, नळ कनेक्शन ग्रामपंचायतीमार्फत पुरविण्यात यावे.

**१४) कुपोषित मुलांमुलींसाठी व किशोरवयीन मुलींसाठी, गरोदर, स्तनदा माता यांना अतिरिक्त आहार :-**

ग्रामीण भागातील अंगणवाडीचे कार्यक्षेत्रातील ६ महिने ते ३ वर्ष व ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील मुलामुलींना अंगणवाडीमार्फत आहार दिला जातो. या व्यतिरिक्त कुपोषित मुलांचे कुपोषणाचे प्रमाण कमी व्हावे यासाठी विशेष आहार म्हणून प्रोटीन सिरप, प्रोटीन पावडर, मायक्रोन्युट्रीयंन्ट सप्लीमेंटेशन सिरपचा, मिनरल व्हिटॅमिन्सचा पुरवठा करण्यात यावा. तसेच स्थानिक उपलब्धतेनुसार दुध, सोयादुध,चिक्की, लाडू, अंडी, फळे, गुळ शेंगदाणे इत्यादी पौष्टीक व प्रथिनयुक्त आहार तसेच गर्भवती , स्तनदा माता व किशोरी मुलींसाठी लोहयुक्त गोळया देणेत याव्यात. किशोरवयीन म्हणजेच १३ ते १९ वयोगटातील दारिद्रय रेषेखालील शालेय व शाळाबाह्य मुलींना आवश्यक अशा आरोग्यविषयक साहित्याचे मोफत वाटप करण्यात यावे. (उदा. सॅनिटरी नॅपकीन इ.)

उपरोक्त साहित्याचा पुरवठा एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत होत असल्यास या योजनेमधून सदर साहित्याचा पुरवठा करण्यात येऊ नये.

**१५) दुर्धर आजारी मुलांचे शस्त्रक्रियेसाठी अर्थसहाय्य :-**

ज्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे अशा कुटुंबातील ० ते ६ वयोगटातील मुलामुलींच्या हृदय शस्त्रक्रिया, हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया, अस्थिव्यंग असणाऱ्या, क्लेप पॅलेट, सेरेब्रलपाल्सी, कर्करोग, किडणीतील दोष अशा गंभीर शस्त्रक्रिया करणेसाठी, त्या कुटुंबाला आर्थिक सहाय्य मिळावे म्हणून प्राथमिक तपासणीसाठी रु. १५,०००/- पर्यंत व ऑपरेशन झाल्यानंतर रु. ३५०००/- पर्यंत किंवा प्रत्यक्ष झालेला खर्च यापैकी कमी असेल ती रक्कम अर्थसहाय्य देता येईल. ज्या कुटुंबांनी अशा प्रकारच्या गंभीर शस्त्रक्रिया हॉस्पीटलमध्ये



करुन घेतलेल्या आहेत, त्यांच्या कागदपत्रांची शहानिशा जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडून करुन घेण्यात येईल.

**१६) महिलांना विविध साहित्य पुरविणे :-**

यामध्ये पिठाची गिरणी, सौर कंदिल, शिलाई मशीन, पिको फॉल मशीन असे साहित्य पुरविणेत यावे. वस्तु वाटप करताना प्रति महिला जास्तीतजास्त रु. २०,०००/- खर्च करणेत यावा. तसेच प्रत्येक लाभार्थीचा १० टक्के सहभाग घेणेत यावा. जमा होणारे लाभार्थी हिस्सामधून वस्तु साहित्य खरेदी करता येईल .या योजनेच्या अंमलबजावणीसाठी योग्य लाभार्थी मिळविण्याच्या अनुषंगाने पुरेशी व व्यापक प्रसिध्दी देऊन प्रथम अर्ज मागवून त्यातील दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील पात्र महिलांना या योजनेचा प्राथम्याने लाभ द्यावा. जर दारिद्रय रेषेखालील महिला लाभार्थी पुरेशा प्रमाणात न सापडल्यासच रु. ५०,०००/- पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या अन्य महिला लाभार्थींना महिला व बाल कल्याण समितीच्या मान्यतेने या योजनेचा लाभ देण्यात यावा.

**१७) ५ वी ते १२ वी पर्यंत शिकणाऱ्या मुलींसाठी सायकल पुरविणे :-**

ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थीनीना त्यांचे राहत्या गावापासून शाळेत जाणे येण्यासाठी कमीत कमी २ किलोमीटर अंतर चालत जावे लागते, अशा विद्यार्थीनींना या योजनेचा प्राथम्याने लाभ देण्यात यावा. असे लाभार्थी संपल्यानंतर १ कि. मी. पेक्षा जास्त अंतरावरील विद्यार्थीनींना जिल्हा परिषदेच्या मान्यतेने लाभ देण्यास हरकत नाही. सर्वसाधारण लाभार्थ्यांनाही या योजनचा लाभ देता येईल. परंतु लाभ देताना दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील पात्र विद्यार्थीनींचा प्राथाम्याने विचार करण्यात यावा.

**१८) घरकुल योजना :-**

घटस्फोटीत व परितक्त्या महिलांना दोलायमान परिस्थितीत जीवन जगावे लागते. याचा विचार करता ज्या महिलांकडे हक्काचे घर नाही अशा दारिद्रय रेषेखालील व वार्षिक उत्पन्न रु. ५०,०००/- पर्यंत असणाऱ्या महिलांना हक्काचा निवारा मिळावा म्हणून रु. ५०,०००/- पर्यंत घरकुलासाठी खर्च करण्यात यावा.

गट "अ" च्या प्रशिक्षण व सक्षमीकरणाच्या योजनांसाठी समितीच्या एकूण निधीपैकी ५०% आणि वस्तु खरेदीच्या योजनांसाठी ५०% निधी खर्च करण्यात यावा. परंतू गट "अ" वरील खर्च रु. १.०० कोटीपेक्षा जास्त होत असल्यास उर्वरित निधी गट "ब" च्या योजनांकडे वळविण्यास मुभा राहील. एकुण खर्चाच्या ३ % टक्के रक्कम अपंग महिला आणि बालकांसाठी खर्च करण्यात यावी.

गट "अ" च्या प्रशिक्षण व सक्षमीकरणाच्या योजनांसाठी खर्च करावयाच्या ५०% निधीपैकी २०% निधी योजना क्रमांक १ मधील "मुलीना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे" या कौशल्य विकास व व्यावसायिक प्रशिक्षण योजनेवर खर्च करावा. उर्वरित ३०% रक्कम गट "अ" मधील इतर योजनांसाठी खर्च करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०१२४१७०५३११४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mallinath S Kalshetti

Digitally signed by Mallinath S Kalshetti
DN: CN = Mallinath S Kalshetti, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Rural Development Department
Reason: I am approving this document
Date: 2014.01.27 14:15:45 +05'30'

डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव.
५) मा. राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव.
६) मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
७) मा. विधानसभा/ मा. विधानपरिषद सदस्य (सर्व)
८) मा. प्रधान सचिव (ग्राम विकास व पंचायत राज).
९) मा. प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकिय भवन, मुंबई.
१०) विभागीय आयुक्त (सर्व).
११) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१२) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च रोड पुणे-४११००१.
१३) संचालक, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, कोकण भवन, नवी मुंबई.
१४) निवड नस्ती, कार्यासन क्र.पंरा-१, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत,

१) मा. प्रधान सचिव, महिलांचे हक्क व कल्याण समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
२) मा. प्रधान सचिव, पंचायत राज समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांजकडे माहितीसाठी रवाना.

# परिशिष्ट - " ब "

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**मंगळवार, दिनांक ०७ जानेवारी, २०१४**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, गोंदिया**

**उपस्थिती**

१. श्री. जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री. काशिराम पावरा, वि.स.स.
३. श्री. वैजनाथ शिंदे, वि.स.स.
४. श्री. विजयराव खडसे, वि.स.स.
५. श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
६. श्री. बाबासाहेब पाटील, वि.स.स.
७. श्री. संजय भेगडे, वि.स.स.
८. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
९. श्री. राजकुमार बडोले, वि.स.स.
१०. श्री. संजय राठोड, वि.स.स.
११. श्री. सुर्यकांत दळवी, वि.स.स.
१२. ॲड.आशिष जयस्वाल, वि.स.स.
१३. श्री. राजाराम ओझरे, वि.स.स
१४. श्री. विक्रम काळे, वि.प.स.
१५. श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

**निमंत्रित**

१६. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.
१७. श्री. दादाराव केचे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. गंगाधर कोहळे, उप सचिव

श्री. ना.रा.थिटे, अवर सचिव.



**ग्रामविकास विभाग, मंत्रालय**

श्री. श्रावण पाटील, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. के.एम.विधाते, संचालक

**जिल्हा परिषद, गोंदिया**

(१) श्री. ज्ञा.द.शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. सचिन साबळे, अति.मु.का.अ.(अ.का.)
(३) श्री. आर.आर.पराते, प्रकल्प संचालक(जिग्राविय‍ं)(अ.का.)
(४) श्री. दि.वा.जाधव, मु.ले.वि.अ.(अ.का.)
(५) श्री. उ.ना.वाकोडीकर, उप मु.का.अ.(सामान्य) (अ.का.) (ल.पा.)
(६) श्री. स.चो.साबळे, उप मु.का.अ.(बाक)
(७) श्री. व्ही.एल.राठोड, उप मु.का.अ.(पंचायत)
(८) डॉ.एस.एस.कळमकर, जिल्हा आरोग्य अधिकारी
(९) कु.वंदना शिंदे, कृषी विकास अधिकारी
(१०) डॉ.म.पु.मल, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (अ.का.)
(११) श्री. ध.न.पाटील, शिक्षणाधिकारी (प्रा.)
(१२) श्री. शरद खंडागळे, शिक्षणाधिकारी (मा.)
(१३) श्री. पी.डी.लोखंडे, कार्यकारी अभियंता (सा.बां.)
(१४) श्री. उ.ना.वाकोडीकर, का.अ.(ल.पा.)
(१५) श्रीमती एन.एस.अंसारी, का.अ.,प्र.मंग्रासयो
(१६) श्री. विनोद उध्दरवार, का.अ.(प्र.)
(१७) श्री. एल.एम.मोहबंसी, ग.शि.अ.,पं.स.गोंदिया
(१८) श्री. आर.एन.मेश्राम, तत्कालिन उप शिक्षणाधिकारी (प्राथ.)
(१९) श्री. एस.एस.कटरे, तत्कालिन प्रभारी का.अ.

(२०) डॉ. बी. के. मेश्राम, माजी जिल्हा आरोग्य अधिकारी,

(२१) श्री. स.क.वालकर, ग.वि.अ., गोंदिया,

(२२) श्री. शा.ना.मेश्राम, ग.वि.अ., देवरी,

(२३) श्री. हे.ब.शहारे, ग.वि.अ., गोरेगाव,

(२४) श्री. रा.ज.धांडे, ग.वि.अ., सडक अर्जुनी,

(२५) श्री. गो.धा.कोरडे, ग.वि.अ., अर्जुनी/मोर,

(२६) श्री. सु.न.पांडे, ग.वि.अ., तिरोडा,

(२७) श्री. रा.लो.पुराम, ग.वि.अ., आमगाव,

(२८) श्री. वि.उ.पचारे, ग.वि.अ., सालेकसा,

(२९) श्री. प्रदिप गोगुलवार, सेवानिवृत्त ग.वि.अ., गोंदिया.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने गोंदिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००८-२००९ व सन २००९-२०१० च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील गोंदिया जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.



**गुरुवार, दिनांक १७ जुलै २०१४**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सिंधुदुर्ग**

**उपस्थिती :**

(१) श्री. जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

(३) श्री. दिलीप माने, वि.स.स.

(४) श्री. राजकुमार बडोले, वि.स.स.

(५) श्री. सुर्यकांत दळवी, वि.स.स.

(६) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(७) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

**निमंत्रित :**

(८) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. गं.दु.कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी

श्री. ना.रा.थिटे, अवर सचिव.

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. के.एम.विधाते, संचालक

**ग्राम विकास विभाग, मंत्रालय**

श्री. दि.ग.मोरे, सह सचिव

**जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग**

(१) श्री. दिलीप पांढरपट्टे, मुख्य कार्यकारी अधिकारी,

(२) श्री. सुनिल रेडकर, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी,

(३) श्री. संतोष धोत्रे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.),

(४) श्री. मारुती कांबळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी.

(शा.म.मु.) एचबी ११७५—६ (७००—७-२०१५)

(५) श्री. सोमनाथ रसाळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.),
(६) श्री. रत्नाकर धाकोरकर, शिक्षणाधिकारी (प्रा.),
(७) श्री. देवीदास कुळाल, शिक्षणाधिकारी (माध्य.),
(८) श्री. सुनिलकुमार नाशिककर, प्र.कार्यकारी अभियंता (बांध.),
(९) श्री. अनिल भालेराव, कार्यकारी अभियंता (ल.पा.),
(१०) श्री. श्रीकृष्ण होर्शिंग, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.),
(११) डॉ.महेश खलिपे, जिल्हा आरोग्य अधिकारी,
(१२) श्री. सिध्दाण्णा म्हेत्रे, कृषी विकास अधिकारी,
(१३) श्री. सत्यनारायण चंदेल, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी ,
(१४) श्री. संतोष भोसले, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,
(१५) डॉ.शिवाजी थोरात, वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूसवियं, सिंधुदुर्ग,
(१६) डॉ.एन.व्ही.सोडल, अति.जिल्हा आरोग्य अधिकारी,
(१७) श्री. एन.बी.भोई, कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु., कोल्हापूर,
(१८) श्री. ए.वाय.जाधव, अति.मु.का.अ. (सेवानिवृत्त),
(१९) श्री. ए.डी.कांबळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (तत्कालीन),
(२०) डॉ.रमेश कुलकर्णी, अति.जिल्हा आरोग्य अधिकारी (सेवानिवृत्त),
(२१) श्री. प्रशांत चव्हाण, गट विकास अधिकारी (प्रभारी), दोडामार्ग,
(२२) श्री. शरद महाजन, गट विकास अधिकारी, सावंतवाडी,
(२३) श्री. तुकाराम जाधव, गट विकास अधिकारी (प्रभारी), वेंगुर्ला,
(२४) श्री. वासुदेव नाईक, गट विकास अधिकारी (प्रभारी), कुडाळ,
(२५) श्री. राजेंद्र पराडकर, गट विकास अधिकारी (प्रभारी), मालवण,
(२६) श्री. चंद्रसेन मकेश्वर, गट विकास अधिकारी, कणकवली,
(२७) श्री. मिलिंद्र जाधव, गट विकास अधिकारी (प्रभारी), वैभववाडी,
(२८) श्री. विजय चव्हाण, गट विकास अधिकारी, देवगड.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००८-२००९ व सन २००९-२०१० च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.



**बुधवार, दिनांक २५ जून २०१४**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. वैजनाथ शिंदे, वि.स.स.
(३) श्री. विजयराव खडसे, वि.स.स.
(४) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
(५) श्री. बाबासाहेब पाटील, वि.स.स.
(६) श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
(७) श्री. संजय भेगडे, वि.स.स.
(८) श्री. राजकुमार बडोले, वि.स.स.
(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित :**

(१०) श्री. दादाराव केचे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. गं.दु.कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
श्री. ना.रा.थिटे, अवर सचिव.

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. के.एम.विधाते, संचालक

**विभागीय प्रतिनिधी**

श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, जलसंधारण विभाग,
श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव (प्रभारी), शालेय शिक्षण विभाग,
श्री. एस.एस.संधू, प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग,
श्रीमती सुजाता सौनिक, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.

श्री.  राजेंद्र पवार, उप सचिव, शालेय शिक्षण विभाग,

डॉ.नरेश गिते, उपसचिव, ग्रामविकास विभाग,

डॉ.सतीश पवार, संचालक, आरोग्य सेवा,

डॉ.(श्रीमती) अर्चना पाटील, अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा,

**गोंदिया जिल्हा परिषद**

श्री. डी.डी. शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी,

श्री. उ.ना. वाकोडीकर, कार्यकारी अभियंता.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २००९-२०१० च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालासंदर्भात गोंदिया जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, जलसंधारण विभाग, प्रधान सचिव (प्रभारी) शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, उप सचिव, शालेय शिक्षण विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, संचालक, आरोग्य सेवा, अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांची साक्ष घेतली.



**गुरुवार, दिनांक २६ जून २०१४**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१)  श्री. जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२)  श्री. विजयराव खडसे, वि.स.स.

(३)  श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

(४)  श्री. राजकुमार बडोले, वि.स.स.

(५)  श्री. सुर्यकांत दळवी, वि.स.स.

(६)  श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित :**

(७) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. गं.दु.कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी.

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. के.एम.विधाते, संचालक

**विभागीय प्रतिनिधी**

डॉ.एस.के.गोयल, अपर मुख्य सचिव, कृषी व पणन विभाग,

श्री. एस.एस.संधु, प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग,

श्री. दि.ग.मोरे, सह सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. प्रकाश ठुबे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग,

डॉ.नरेश गिते, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. गोपीनाथ आल्हाट, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग,

श्री. ज्ञा.द.शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २००९-२०१० च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात गोंदिया जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, कृषी व पणन विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, सह सचिव, ग्रामविकास विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांची साक्ष घेतली.



**बुधवार, दिनांक २ जुलै २०१४**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

(३) श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

(४) श्री. राजकुमार बडोले, वि.स.स.

(५) श्री. सुर्यकांत दळवी, वि.स.स.

(६) ॲड.आशिष जयस्वाल, वि.स.स.

(७) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

**निमंत्रित :**

(८) श्री. सुरेश हळवणकर, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. गं.दु.कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी

श्री. ना.रा.थिटे, अवर सचिव.

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. के.एम.विधाते, संचालक

**विभागीय प्रतिनिधी**

श्री. एस.एस.संधु, प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग,

श्री. आर.डी.शिंदे, सचिव, सामाजिक न्याय विभाग,

डॉ.नरेश गिते, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. डी.डी.शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया,

श्री. सु.सं.धांडे, मुख्य अभियंता, महावितरण कंपनी, मुख्य कार्यालय, मुंबई.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २००९-२०१० च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात गोंदिया जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, सचिव, सामाजिक न्याय विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया, मुख्य अभियंता, महावितरण कंपनी, मुख्य कार्यालय, मुंबई यांची साक्ष घेतली.



**मंगळवार, दिनांक १६ जून २०१५**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

३. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

४. श्री. समीर कुणावार, वि.स.स

५. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

६. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

७. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

८. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

९. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

१०. श्री. अमित झनक, वि.स.स.

११. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

१२. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

१३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.

१४. ॲड.रामहरी रुपनवर, वि.प.स.

१५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. ना. रा. थिटे, अवर सचिव.

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. के. एम. विधाते, संचालक,

**विभागीय प्रतिनिधी**

श्रीमती मेधा गाडगीळ, अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, मंत्रालय,

श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय,

श्री. उज्ज्वल उके, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय,

श्री. संजय कुमार, प्रधान सचिव, महिला व बालकल्याण विभाग, मंत्रालय,

श्री. विजय कुमार, प्रधान सचिव, वित्त (सुधारणा) विभाग, मंत्रालय,

श्रीमती सुजाता सौनिक, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,

श्री. प्रभाकर देशमुख, सचिव, रोहयो, मंत्रालय,

श्री. राजगोपाल देवरा, सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,

श्री. शरद सबनीस, सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग,

श्री. वि.ज.सुरळकर, संचालक, विमा संचालनालय,

श्री. अरविंदकुमार झा, प्रधान मुख्य संरक्षक, वन विभाग,

श्री. भगवान, अपर प्रधान मुख्य संरक्षक, वन विभाग,

डॉ. सतीश पवार, संचालक, आरोग्य संचालनालय,

श्री. दिलीप पांढरपटे, मुख्य कार्यकारी अधिकारी, सिंधुदुर्ग जिल्हा,

श्री. प्रशांत पाटील, कार्यकारी अभियंता, सा.बा.वि.,

श्री. सु.बा.साळोखे, का.अ.जि.प., सिंधुदुर्ग.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २००९-२०१० च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, प्रधान सचिव, महिला व बालकल्याण विभाग, प्रधान सचिव, वित्त (सुधारणा) विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, रोजगार हमी योजना विभाग, सचिव, आदिवासी विकास विभाग, सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, संचालक, विमा संचालनालय, मुंबई, प्रधान मुख्य संरक्षक, वन विभाग, संचालक, आरोग्य संचालनालय, मुंबई, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांची साक्ष घेतली.



**बुधवार, दिनांक ०१ जुलै २०१५**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

४. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

५. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

६. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

७. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

८. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

९. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

१०. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

११. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

१२. श्री. अमित झनक, वि.स.स.

१३. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१४. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

१५. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

१६. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. ना. रा. थिटे, उप सचिव

**विभागीय प्रतिनिधी**

श्री. उज्ज्वल उके, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग

श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

श्री. नंदकुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग

श्री. विवेक नाईक, सचिव, (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग

श्री. शेखर सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

श्री. सुनील रेडकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) व (सा.प्र.), जि. प. सिंधुदुर्ग

श्री. महावीर माने, शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

२००९-२०१० च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव, (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग, शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांची साक्ष घेतली.



**शुक्रवार, दिनांक २४ जुलै २०१५**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
३. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
४. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
५. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
६. श्री. राजेंद्र नजरधाने, वि.स.स.
७. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
८. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
९. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१०. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
११. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
१३. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
१४. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. ना. रा. थिटे, उप सचिव

श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती).

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत पहिल्या अहवालाच्या प्रारूपावर विचार करून ते किरकोळ सुधारणासह संमत केले.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

अहवाल क्रमांक : १४३

# पंचायती राज समिती

## २०१५-२०१६

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ व २००९-२०१० च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत**

# पहिला अहवाल

(सदर अहवाल दिनांक       जुलै २०१५ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई
२०१५

अहवाल क्रमांक : १४३

पंचायती राज समिती

२०१५-२०१६

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ व २००९-२०१० च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत

पहिला अहवाल

(सदर अहवाल दिनांक       जुलै २०१५ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१५